




दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com








बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-२६० | रविवार, दि.१२ जानेवारी २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने- ६ | किंमत ३ रूपये


# गोकुळची म्हैस दूध खरेदी दरात २ रुपयांची वाढ

## शेतकऱ्यांना सरकारकडून दूध दरवाढीची अपेक्षा वाढली

**कोल्हापूर । प्रतिनिधी**

**कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाकडून (गोकुळ) म्हैस उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा दिला आहे. शनिवार (दि.११) म्हैस दूध खरेदी दरात प्रतिलिटर २ रुपयांची वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याबाबतची माहिती संघाचे अध्यक्ष अरूण डोंगळे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली. ६.५ फॅट आणि ९.० एसएनएफपासून पुढे ही दरवाढ उत्पादक शेतकऱ्यांना मिळणार आहे. दरम्यान, राज्यातील शेतकऱ्यांना आता सरकार दूध दरात वाढ करील अशी अपेक्षा वाढली आहे.**

गोकुळने काढलेल्या प्रसिद्धी पत्रकाद्वारे, गोकुळचे सध्या म्हैस दूध संकलन ९ लाख ३० हजार लिटर प्रतिदिन इतके आहे. सध्या म्हैस दुधाची मुंबई, पुण्यासह सर्वच ठिकाणी मागणी वाढली आहे. म्हैस दुधाचे उत्पादन जास्त व्हावे यासाठी गोकुळ दूध संघाकडून विविध प्रयत्न केले जात आहेत. म्हैस दूध उत्पादकांना प्रोत्साहन देण्यासाठी गोकुळच्या संचालक मंडळाने ६.५ फॅट व ९.० एसएनएफसाठी ◀◀ पान २ वर




### गाय खरेदी दूध दरात वाढ

राज्यातील सहकारी आणि खासगी दूध संस्थांनी नववर्षाच्या स्वागतालाच गाय दूध खरेदी दरात प्रतिलिटर १ रूपयांची वाढ केली. यामध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील गोकुळ आणि वारणा या दोन दूध संघांनी वाढ केली नाही. ज्या दूध संघांनी दरवाढ केली आहे, त्या दूध संघांकडून ३.५ फॅट व ८.५ एसएनएफसाठी प्रतिलिटर तीस रुपये दर दिला जाणार आहे. यापूर्वी गोकुळ आणि वारणा दूध संघाने दर वाढवून दिल्याने त्यांनी खरेदी दरात वाढ केली नाही.

### फेब्रुवारीनंतर खरेदी दरात वाढ शक्य

फेब्रुवारी महिन्यात दुधाबरोबरच पावडर व बटरची मागणी वाढते. याचा अंदाज घेऊन दूध खरेदी दरात वाढ होते. मागील वर्षभरापासून गाय दूध उत्पादकांचा दरावरून मोठा संघर्ष सुरू आहे. येत्या महिन्याभरात दूध दरात वाढ अपेक्षित आहे.

## तिजोरीत खडखडाट; मद्याच्या दरात वाढ होण्याची शक्यता



**पुणे । प्रतिनिधी**

महायुती सरकारच्या विविध लाडक्या योजनांचा बोजा आता मद्य सेवन करणाऱ्यावर पडण्याची शक्यता आहे. महायुती सरकारला निवडणुकीच्या मैदानात भरघोस मते मिळवून देणाऱ्या लाडक्या बहिण योजनेसोबतच विविध लाभार्थी योजनांमुळे राज्यातील तिजोरीत खडखडाट झाला आहे. त्यामुळे राज्य सरकारसमोर आर्थिक पेच निर्माण झाला आहे. त्यावर अधिकचा महसुल मिळवण्यासाठी राज्य सरकार मद्यावरील करात वाढ करण्याची चिन्हं दिसू लागली आहेत. राज्य सरकारने गृहनिर्माण विभागाच्या अप्पर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठित केली आहे. त्यामुळे मद्य सेवन करणाऱ्यांना मोठा झटका बसण्याची शक्यता आहे.

महायुती सरकारकडून गठित ◀◀ पान २ वर

# आरक्षण मिळाल्यावर धनंजय मुंडेंना पाहतो





## मनोज जरांगे यांचा धनंजय मुंडेवर सभेतून हल्ला

**धाराशिव । प्रतिनिधी**

मी मागे लागलो तर पाणी पाजल्याशिवाय सोडत नाही. मी २५ तारखेपर्यंत काहीच बोलणार नाही. त्यावेळी उपोषण केल्यावर मराठा समाजास आरक्षण मिळाल्यावर मग धनंजय मुंडे यांना पाहतो. धनंजय मुंडे हे त्यांचे पाप लपवण्यासाठी ओबीसीचे पांघरुन घेत आहे, असे मनोज जरांगे यांनी म्हटले आहे. धाराशिव येथील आक्रोश मोर्चात ते बोलत होते.

मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी धाराशिवमधील आक्रोश मोर्चातून धनंजय मुंडे यांच्यावर जोरदार हल्ला केला. गाठ मनोज जरांगे यांच्याशी आहे. २५ जानेवारीनंतर तुमची मस्ती उतरवणार, असे मनोज जरांगे यांनी धनंजय मुंडे यांना थेट म्हटले आहे. मनोज जरांगे जाहीर भाषणात म्हणाले, जर या पुढे मराठ्यांना त्रास झाला तर सामना मनोज जरांगे यांच्याशी आहे. धनंजय मुंडे यांना सांगतो, तुमची टोळी थांबवा. ही धमकी नाही तर सावध करत आहे. यापुढे तुमच्या गुंडांनी कोणाला त्रास दिला तर लक्षात ठेवा त्यांचा बंदोबस्त आम्ही करणार आहोत. तुमचे पाप झाकण्यासाठी पांघरुन घेऊ नका, असे मनोज जरांगे यांनी म्हटले आहे.

### आकाचा आकालाही बिनभाड्याच्या खोलीत पाठवा-धस

आतापर्यंत आ. सुरेश धस हे आका म्हणून वाल्मिक कराड यांच्यावरच हल्लोबोल करीत होते. आता मात्र धस यांनी धाराशिव येथील मोर्चात थेट धनंजय मुंडे यांच्यावर हल्ला चढवला. आकाच्या आकालाही आता बिनभाड्याच्या खोलीत पाठवा, असे आवाहन त्यांनी शासनाला केले. तसेच मुंडे यांची मंत्रिमंडळातून हाकालपट्टी करा, असेही ते म्हणाले.

# सुरेश धस यांनी बीडला बदनाम केले





## संतोष देशमुख हत्येप्रकरणात मंत्री पंकजा मुंडे थेट बोलल्या

**बीड । प्रतिनिधी**

**धस यांच्यावर काय बोलू? मी कुठं गप्प आहे. मी एसआयटीची मागणी केली होती. पहिली मागणी मी केली. माझ्या बोलण्यामुळे राज्य हलले असते तर आत जे ते बोलताय ते पूर्वी का बोलले नाही. मागच्या २ वर्षात का बोलले नाही, असा सवाल करीत सुरेश धस यांनीच बीडला बदनाम केले असा हल्लाबोल मंत्री पंकजा मुंडे यांनी सुरेश धस यांच्यावर केला.**

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर बीड जिल्ह्यातील राजकारण, समाजकारण ढवळून निघाले आहे. सुरुवातीला मारेकऱ्यांना मोकळे रान करून देणाऱ्या यंत्रणांना जनरेट्यापुढे अखेर कारवाई करावी लागली. या निर्घृण हत्येच्या एका महिन्यानंतर सात आरोपींना मोकका लावण्यात आला आहे. या हत्येनंतर मुंडे विरुद्ध इतर नेते असे बीडमध्ये चित्र रंगले आहे. राष्ट्रवादी, ◀◀ पान २ वर

## पुणे कोयता गँगचे बीड कनेक्शन; गोरख सातपुते गजाआड

### स्थानिक गुन्हे शाखेने गेवराईतून हत्यारांसह दोघांना पकडले



**बीड । प्रतिनिधी**

**गेल्या वर्षभरापासून पुणे शहरात कोयता गँगची मोठी दहशत असून अनेकांवर प्राणघातक हल्ले सुध्दा झालेले आहेत. आता पुणे येथील कोयता गँगचे बीड कनेक्शन समोर आले असून गेवराई येथून गोरख सातपुतेसह दोघांना धारदार हत्यारांसह स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गजाआड केले आहे.**

पुणे येथे कोयता गँगची दहशत असून या कोयता गँगची पाळेमुळे शोधून काढण्याचे काम पोलिसांनी सुरु केले होते. त्यानुसार पुणे कोयता गँगचे बीड कनेक्शन समोर आल्यावर यातील मुख्य सुत्रधार असलेल्या गोरख सातपुतेच्या पोलिस मागावर होते. गेवराई येथे तो आपल्या साथीदारासह असल्याची माहिती मिळाल्यावर ◀◀ पान २ वर

## वाल्मिक कराडसोडता सुदर्शन घुलेसह ८ जणांवर मकोका

**बीड-संतोष देशमुख खून प्रकरणातील सर्वच आरोपींवर मकोका लावण्याचा निर्णय गृह विभागाने घेतला असून सुदर्शन घुलेसह प्रतीक घुले, सुधीर सांगळे, कृष्णा आंधळे, विष्णू चाटे, महेश केदार, सिद्धार्थ सोनावणे आणि जयराम चाटे या सर्व आरोपीवर मोक्का लावण्यात आला. खंडणी प्रकरणातील वाल्मिक कराड यांच्यावर मात्र मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली नाही.**

संतोष देशमुख खून प्रकरणातील सर्व आरोपींवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात येत होती. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्व आरोपींवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन दिले होते. मकोका अंतर्गत कारवाई करण्यासाठी पोलिस प्रशासनानेही प्रक्रिया सुरु केली. ◀◀ पान २ वर

### पुराव्यानुसार सर्वांवर कारवाई होणार-फडणवीस

संतोष देशमुख खून प्रकरण आणि खंडणी प्रकरणात कोणालाही सोडले जाणार नाही असे सांगून पुराव्यानुसार कारवाई केली जाणार असल्याची प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

### ६ डिसेंबरला घुले-कराड यांच्यात संवाद

६ डिसेंबर रोजी सुदर्शन घुले आणि वाल्मिक कराड यांच्यात दोन वेळा फोनवर संवाद झाल्याची विश्वसनीय माहिती असून त्यानंतर तीन दिवसाने संतोष देशमुख यांचा खून झाला. त्यामुळे हा पुरावा महत्वाचा मानला जात आहे.

### हा मकोका आम्हाला अमान्य-जरांगे

मनोज जरांगे म्हणाले, संतोष देशमुख प्रकरणातील खून प्रकरणातील आरोपींवर मकोका लागला आहे. पण जर खंडणीतील आरोपीला मकोका लागला नाही तर आम्हाला हा मकोका मान्य नाही. खंडणीतील आरोपीवर मकोका लागला पाहिजे. खंडणीमुळेच हा गुन्हा घडला आहे. त्यामुळे खंडणीतील आरोपी हे खुनाच्या गुन्ह्यात आले पाहिजे. मुख्यमंत्री साहेब तुम्ही कुटुंबाला शब्द दिला तो पाळा, असे मत मनोज जरांगे यांनी व्यक्त केले आहे.

### सगळ्या आरोपींवर मकोका लावा-धनंजय देशमुख

सगळ्या आरोपींवर जोपर्यंत खुनाचा गुन्हा लागत नाही, तोपर्यंत समाधान मिळणार नाही, असे ते म्हणाले. हे सगळे गुन्हेगारी वृत्तीची लोक आहेत, त्यांच्यासह वाल्मिक कराडवरही गुन्हे दाखल व्हायला पाहिजेत. आम्हाला न्याय हवा, जोपर्यंत सर्वांना फाशीची शिक्षा मिळत नाही, तोपर्यंत आम्ही थांबणारा नाही असा निर्धार संतोष देशमुख यांचे भाऊ धनंजय देशमुख यांनी व्यक्त केला.

### विष्णू चाटेला २ दिवसांची सीआयडी कोठडी

देशमुख हत्या प्रकरणात विष्णू चाटे याच्यावरही मकोका लावण्यात आला आहे. विष्णू चाटे हा संघटित गुन्हेगारीचा भाग आहे असे सरकारी वकिलांनी कोर्टात म्हटले होते, विष्णू चाटेच्या चौकशीसाठी कोठडी हवी असा युक्तिवाद वकिलांनी न्यायालयात केला होता. त्यांची ही मागणी मान्य करत न्यायालयाने विष्णू चाटेला २ दिवसांची सीआयडी कोठडी दिली आहे.

## मंत्री आठवलेंची रिपाइं दिल्ली विधानसभा लढविणार

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

दिल्ली विधानसभा निवडणुकीत एनडीए मधील घटक पक्ष आमने-सामने उभे ठाकले आहेत. भाजपच्यावतीने सर्व जागांवर उमेदवार दिले जाणार आहेत. असे असले तरी अजित पवारांच्या राष्ट्रवादीनंतर आता रामदास आठवले यांनीही आपले उमेदवार दिले आहेत. रिपाइं आठवले गटाच्या वतीने दिल्ली विधानसभेसाठी १५ उमेदवारांची घोषणा करण्यात आली. ◀◀ पान २ वर

## पाणीटंचाईच्या कृती आराखड्यात बीड मतदारसंघातील गाव आणि वस्त्यांचा सामावेश करा


### आ.संदीप क्षीरसागरांकडून १६७ गाव आणि वस्त्यांवर हातपंप, बोअरवेलची मागणी



बीड । प्रतिनिधी

जानेवारी २०२५ ते जून २०२५ या काळातील पाणीटंचाईच्या निवारणासाठी कृती आराखडा तयार करून त्यामध्ये बीड मतदारसंघात क्षेत्रातील एकूण १६७ गाव आणि वाडी, वस्त्यांवर नवीन हातपंप बसवणे, बोअरवेल घेणे तसेच जुने हातपंप दुरूस्त करण्याची मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी जिल्हा प्रशासनाकडे केली आहे.

जानेवारी ते जून महिन्याचा कालावधी हा उन्हाळ्याचा असतो. या कालावधीमध्ये बीड जिल्ह्यात पाणीटंचाई निर्माण होते. पाण्याअभावी नागरिक, शेतकरी आणि पशु-पक्षी यांना वणवण करावी लागते. त्यामुळे पाणीटंचाईचे ◀◀ पान २ वर



## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.११ जानेवारी २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १०.०० क्विंटल | २,६३१ | २,७०० | २,६६५ |
| ज्वारी/हायब्रिड: २७.५० क्विंटल | १,९५१ | २,३५० | २,१०९ |
| मका/लोकल: ७.०० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर :११७.५० क्विंटल | ६,५०० | ७,२२० | ६,८८२ |
| उडीद : २.५० क्विंटल | ६,५०१ | ६,५७५ | ६,५३८ |
| बाजरी: ३.५० क्विंटल | २,५३५ | ३,०५५ | २,७९५ |
| मुग : २.५० क्विंटल | ६,३०० | ७,२०० | ६,७५० |
| सोयाबीन: ११७.५० क्विंटल | ३,४६१ | ४,१५० | ४,०१६ |
| हरभरा: २.०० क्विंटल | ५,६०० | ५,६०० | ५,६०० |

# वाल्मिक कराडकडून हार्वेस्टरच्या अनुदानापोटी ११ कोटीचा गंडा

## आणखी एक प्रताप उघड; सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांची लूट

**सोलापुर । प्रतिनिधी**

संतोष देशमुख हत्या प्रकरणात संशयित आरोपी वाल्मिक कराड याचा आणखी एक प्रकार समोर आला आहे. वाल्मिक कराडने राज्यातील १४० शेतकऱ्यांची फसवणूक केली आहे. कृषीमंत्री माझ्या जवळचे आहे, तुम्हाला अनुदान मिळवून देतो, असे सांगत वाल्मीक कराड याने १४० शेतकऱ्यांकडून पैसे घेतले. या सर्वांना ११ कोटी २० लाख रुपयांचा गंडा वाल्मिक कराड याने घातल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. शेतकऱ्यांनी पैसे परत



मागितल्यावर मारहाण करून हाकलून दिल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. वाल्मिक ◀◀ पान २ वर

### पोत्यात भरुन आणले पैसे

वाल्मिक कराड याने सांगितल्यानंतर १४० मशीन मालकांनी प्रत्येकी आठ लाख रुपये गोळा करून ते एका पोत्यात भरले. हे पैसे मुंबई येथील विश्रामगृहात कराड यांना दिल्याचे दिलीप नागणे यांनी सांगितले. मात्र, नंतर कुठल्याच प्रकारचे अनुदान मिळाले नाही. त्यामुळे या मशीन मालकांनी वाल्मिक कराड यास फोन करून आम्हाला अनुदान मिळाले नाही, आमचे पैसे परत द्या, अशी मागणी केल्यावर त्यांना बीडला बोलवण्यात आले. यावेळी हे सर्व १४० मशीन मालक बीड येथे गेले असता तुमचे कोणते पैसे आहेत? असे विचारत कराड आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी मारहाण केल्याचे दिलीप नागणे यांनी सांगितले.

### आता तक्रार देण्यासाठी पोलीस ठाण्यात

या प्रकरणामध्ये सोलापूर, कोल्हापूर, अहिल्या नगर, सांगली या भागातील ऊस तोडणी यंत्र मालकांची फसवणूक केल्याचे दिलीप नागणे यांनी सांगितले. वाल्मिक कराड यांच्या दहशतीमुळे आम्ही पोलिसांत कोणतीही तक्रार दाखल केली नसल्याचेही नागणे यांनी सांगितले. आता वाल्मीक कराड याला अटक झाल्यानंतर हे १४० पैकी सोलापूर जिल्ह्यातील काही मशीन मालक तक्रार देण्यासाठी पंढरपूर ग्रामीण पोलीस ठाण्यात दाखल झाले आहेत.

## अग्रलेख

# आघाडी संपुष्टात येण्याची केवळ औपचारिकताच बाकी

अरविंद केजरीवालांचा आप दिल्ली विधानसभा निवडणूक स्वतंत्रपणे लढवतो आहे. तसे करण्याचा त्यांना अधिकार आहे कारण दिल्लीत इंडिया आघाडीपेक्षा (म्हणजे काँग्रेस) आपची ताकद निर्विवादपणे जास्त आहे. इंडिया आघाडी ही फक्त लोकसभा निवडणुकीपुरती होती, असा संदेश त्यांनी हरियाणा विधानसभा आणि आता दिल्ली विधानसभेच्या निवडणुकीतही दिला आहे. विशेष म्हणजे इंडिया आघाडीतील अखिलेश यादव, उद्धव ठाकरे आणि ममता बॅनर्जी यांनी दिल्लीत आपलाच पाठिंबा जाहीर केला आहे. अखिलेश आपसाठी सभाही घेणार आहेत. उद्धव ठाकरे कदाचित आपच्या व्यासपीठावर जातील, अद्याप त्यांनी तसे जाहीर केलेले नाही. तेजस्वी यादव यांचा राष्ट्रीय जनता दलही आपसोबत आहे व त्यांनी इंडिया लोकसभेसाठी होती असेही म्हटले आहे. बिहार विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला सोबत घेण्यास त्यांची ना नाही. मात्र त्यांच्या शर्तीवर काँग्रेसला काही फुटकळ जागा देऊन ते आघाडी टिकवतील. ममतांना राष्ट्रीय नेत्या होण्याची महत्त्वाकांक्षा आहे व इंडिया आघाडीतील अन्य प्रादेशिक नेत्यांनी त्याला रितसर खतपाणी घातले आहे. त्यात उद्धव ठाकरे आणि शरद पवारही मागे नाहीत. गेल्या दोन अडीच महिन्यांत हे स्पष्ट झाले आहे की आघाडी संपुष्टात आल्याचे जाहीर करण्याची औपचारिकताच तेवढी राहिली आहे.

एक गल्लत अशी होतेय की काँग्रेसला विरोध म्हणून अन्य पक्षांची मंडळी दिल्लीत आपला पाठिंबा देत आहेत किंवा राहुल गांधी यांच्यापेक्षा आघाडीचे नेतृत्व करण्यासाठी ममता बॅनर्जी कधीही सरस आहेत असे त्यांना वाटते व त्यांना तसे करवून घ्यायचे आहे म्हणून ते काँग्रेसच्या विरोधात जाहीर भूमिका मांडत आहेत. मात्र हा समज चुकीचा आहे. त्याची कारणे दोन आहेत. लोकसभा, त्याच्या अगोदरच्या चार राज्यांच्या निवडणुका आणि लोकसभेनंतरच्या काही राज्यांच्या निवडणुका, यातून हाती आलेले निकाल एक सूचित करत आहेत की आता केवळ रेवडी संस्कृतीचे राजकारण चालेल. मग ती रेवडी भारतीय जनता पार्टीची असो किंवा झारखंड मुक्ती मोर्चाची. जो आम्हाला फुकट देईल त्याला आम्ही मत देणार अशा निर्णयाप्रत मतदारांमधील एक मोठा वर्ग पोहोचला आहे. त्यांचा जाती-धर्माशी काही संबंध नाही. आघाडी विस्कटण्याचे दुसरे कारण त्यापेक्षा जास्त महत्त्वाचे आहे व ते देशाच्या राजकारणावर दूरगामी परिणाम करण्याची क्षमता असणारे आहे. हे कारण आहे हिंदुत्वाचा मुद्दा. नव्वदच्या दशकात भाजपने हाती घेतलेला हिंदुत्वाचा मुद्दा आज त्यांच्या बाजूने कौल देताना दिसतो आहे. पक्षाला विविध निवडणुकांत मिळणाऱ्या मतांच्या टक्केवारीतील सातत्य आणि त्यात कणाकणाने होणारी वाढ ही बाब अधोरेखित करते की याच मुद्द्यावर भाजपचा मतदार त्यांच्याशी एकनिष्ठ राहतो आहे. मागच्या लोकसभेच्या वेळी राहुल गांधी किंवा काँग्रेसला याची जाणीव झाल्यामुळे काँग्रेसनेही सॉफ्ट हिंदुत्वाचा मार्ग स्वीकारला होता. राहुल गांधी यांच्या मंदिरांच्या वाऱ्या वाढल्या होत्या व जानवेधारी ब्राह्मण असे त्यांना म्हटलेही जाऊ लागले होते. २०१४ च्या पराभवाच्या समीक्षेसाठी काँग्रेसने जी समिती नेमली होती त्यांनीही असेच सूचवले होते की काँग्रेस हिंदूविरोधी असल्याची मतदारांमध्ये झालेली भावना पक्षाला हानीकारक ठरली. या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने सॉफ्ट हिंदुत्व सोडत पुन्हा अति अल्पसंख्याक वादाला महत्त्व दिले आणि तसा संदेशही दिला. इंडिया आघाडीतील बहुतांश पक्ष धर्मनिरपेक्ष आहेत. काँग्रेसची अनुनयाची भूमिका त्यांना फारशी अडचणीची नव्हती. मात्र एवढे करूनही लोकसभेत पराभव झाला. त्याहीपेक्षा ज्या राज्यांत इंडिया आघाडीची कामगिरी चांगली झाली होती त्या राज्यांत नंतर काँग्रेस वा आघाडीला सत्ता गमवावी लागली. एवढेच नव्हे तर उत्तर प्रदेश सारख्या राज्यांत पोटनिवडणुकांमध्ये मार खावा लागला. भाजपवर टीका करण्याच्या प्रयत्नात आपण हिंदूविरोधी असल्याचे अधोरेखित होते आहे याची जाणीव या पक्षांना झाली व ती सर्वप्रथम अरविंद केजरीवाल यांना झाली. त्यांनी आता हिंदू पुजाऱ्यांना वेतन देण्याची रेवडी आणि हिंदुत्वाची सांगड घालणारी योजना सुरू केली आहे. ज्येष्ठांसाठी तिर्थयात्रा सुरू केली व अयोध्येलाही जाऊन आले. यापूर्वी त्यांनी इमामांना दरमहा वेतन देण्याची घोषणा केली होती. ते वेतन त्यांनी इमामांना गेल्या १७ महिन्यांपासून दिले नाही. यातून केजरीवाल दिल्लीतील हिंदू मतदारांना काय संदेश देऊ पाहत आहेत हे स्पष्ट आहे. अल्पसंख्याक समुदायातील कट्टरवाद्यांच्या विधानांवर गप्प राहायचे आणि सतत भाजप अथवा संघविरोधी मते मांडल्यामुळे सर्वसामान्य मतदार आपला होत नाही. एका विशिष्ट समुदायासाठी बहुसंख्य समुदायाला न मानवणारे राजकारण आपल्या सोईचे नाही हा जर आघाडीतील नेत्यांचा निष्कर्ष असेल तर काँग्रेसशी सोयरीक ते फार काळ टिकवणार नाहीत. काँग्रेसनेही त्यांच्या पराभवाची समिक्षा करणाऱ्या अँटोनी आणि चिदंबरम समितीचा अहवाल निट समजून घ्यावा म्हणजे मग त्यांना काही गोष्टी लक्षात येतील.

# स्वराज्यप्रेरिका विजयवर्धिनी कुलमुखत्यार: राजमाता जिजाऊ !



यदा यदा ही धर्मस्य ग्लानिर्भवती भारत! अभ्युथानंधर्मस्य तदत्मानं सृजाम्यहम ! परित्राणाय साधुनाम विनाशाय च दुष्कृताम्? धर्म संस्थापनार्थाय संभावामी युगे युगे! जेव्हा जेव्हा भारतामध्ये धर्माची हानी होईल , जेव्हा जेव्हा अधर्म वाढेल , तेव्हा तेव्हा मी येईल , सज्जन लोकांचे रक्षण करण्यासाठी आणि दृष्ट लोकांचा नाश करण्यासाठी . धर्माची स्थापना करण्यासाठी प्रत्येक युगात मी जन्म घेईल . या भगवद्गीतेतील ओळी सार्थ ठरतात जेव्हा स्वराज्यप्रेरिका विजयवर्धिनी राजमाता मासाहेब जिजाऊ यांचे जीवन चरित्र आपण वाचतो . वरून आसमानी संकट आणि खाली मुघल साम्राज्याचे वाढते वर्चस्व या काळामध्ये म्हाळसाबाई व लखुजी जाधव यांच्या पोटी १२ जानेवारी १५९८ रोजी बुलढाणा येथील सिंदखेडराजा येथे कन्यारत्न जन्माला आले . पारतंत्र्यामध्ये जन्माला आलेल्या जिजाऊ ला लहानपणापासूनच गुलामीची लाचारी , जीवनाची चीड निर्माण झाली होती . त्यामुळेच ज्या वयात मुले खेळभांडे खेळण्यात व्यस्त असायचे त्या वयात त्यांनी समशेर हातात घेऊन स्वराज्य स्थापनेची खूणगाठ मनाशी बांधली होती . अगदी लहान वयात असतानाच त्या घोडसवारी , तलवारबाजी अशा विविध युद्ध कलेमध्ये पारंगत झाल्या होत्या . डिसेंबर १६०५ मध्ये जिजाऊंचा विवाह शहाजीराजांशी दौलताबाद येथे झाला . विदर्भाची कन्या ही मराठवाड्याची सून झाली होती . मराठवाड्यात आल्यावरही आदिलशाही , निजामशाही , मुघलशाही अशा वेगवेगळ्या सुलतानांच्या पारतंत्र्यात जगत असणाऱ्या रयतेची हतबलता , शहाजीराजांना जहागिरी असूनही मिळणारे दुय्यम स्थान , शेतकऱ्यांची असणारी बिकट अवस्था , स्त्रियांची अब्रू वेशीवर टांगणारे , त्यांचा छळ करणारे सुलतान हे सगळे पाहून जिजाऊंचे मन उद्विग्न व्हायचे म्हणूनच त्यांनी स्वराज्याची स्थापना व्हावी हे एकच स्वप्न पाहिले होते व आपल्या पोटी स्वराज्य निर्माता जन्माला यावा असे साकडे त्यांनी आई भवानीला घातले . १९ फेब्रुवारी १६३० रोजी किल्ले शिवनेरी येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्म झाला . त्यानंतर शहाजीराजांना बेंगलोर मध्ये कर्नाटक जहागिरी सुपूर्द करण्यात आली . म्हणून त्यांनी वडिलोपार्जित पुणे जहागिरी मासाहेब जिजाऊ यांच्याकडे सोपविली . यानंतर मासाहेब आणि बाल शिवबा पुणे येथे वास्तव्य आले . मात्र तेथील अवस्था पाहून जिजाऊंचे मन हेलावून गेले . पुणे येथे दुष्काळ पडलेला होता व ते ओसाड झाले होते आणि तेव्हाच निजामशाही सरदार मुरारजगदेव यांनी पुणे जाळून टाकले होते . त्या भूमीवरून गाढवाचा नांगर फिरवून ही भूमी अपवित्र आहे असे सांगून शेतकऱ्यांना भ्रमित केली होते . या उलट मासाहेबांनी बाल शिवबाच्या हस्ते तिथे सोन्याचा नांगर चालवला . तिथे शेती करण्यासाठी शेतकऱ्यांना बी बियाणे , औत , शेती साहित्य अनुदान देण्यास सुरुवात केली . जंगली जनावरांपासून पिकांचे संरक्षण व्हावे यासाठी तरुण मावळ्यांना सोन्याचे कडे बक्षीस देण्याची शर्थ ठेवली . यामुळे तरुण मावळ्यांना काम ही मिळू लागले व या निमित्ताने त्यांच्या मनामध्येही स्वराज्याची स्वप्ने गुंफण्यास मासाहेबांनी प्रयत्न चालू केले . तलवारीच्या धारेवर नव्हे तर कौतुकाच्या थापेवर त्यांनी मावळे जोडण्यास सुरुवात केली . आणि हेच मावळे नंतर शिवरायांसोबत अखेरच्या श्वासापर्यंत लढताना दिसले . पुणे सोडून गेलेल्या रयतेला पुन्हा पुण्यात स्थायिक होण्यासाठी प्रयत्न केले . पुण्याची पुनर्स्थापना करण्याचे तसेच आधुनिक प्रगत पुण्याचा पाया घालण्याचे श्रेय जिजाऊंना जाते . याचबरोबर शिवरायही मोठे होत होते . स्वराज्य स्थापना हेच जिजाऊ चे अंतिम लक्ष्य होते . त्यासाठी त्यांनी बाल शिवबाच्या जडणघडणीकडे व संस्काराकडे विशेष लक्ष दिले . पुस्तकी शिक्षणाबरोबरच त्यांनी शिवरायांना राजकीय शिक्षण देण्यास सुरुवात केली . वेगवेगळ्या पराक्रमी शूरवीरांच्या कथा सांगून त्यांनी शिवरायांना स्वराज्याचे महत्त्व पटवून दिले . त्यांच्या मनामध्ये स्वराज्याच्या स्वप्नांची पेरणी करण्यास सुरुवात केली . स्वराज्य स्थापनेमध्ये छत्रपतींना सर्वात मोठी मदत झाली ते जिजाऊंनी दिलेल्या भौगोलिक शिक्षणाची शिवनेरीच्या अंगाखांद्यावर खेळताना सह्याद्रीच्या कुशीत निर्भयपणे वावरायला त्यांनी शिवरायांना शिकवले आणि याच शिक्षणातून पुढे शिवरायांनी गनिमीकावा तंत्र वापरून मोठमोठ्या सुलतानी संकटांना मात दिली . शिवराय पन्हाळगडावर सिद्धी जोहरच्या वेढ्यात अडकलेले असताना या वीर मातेने स्वतः च्या हाती तलवार घेऊन वेढा फोडण्याची सिद्धता दाखवली होती . सिद्धी जोहार शिवरायांना पडलेला वेढा , स्वराज्यावरील मिर्झा जयसिंगची स्वारी , संभाजी राजे सोबत शिवाजीराजांनी केलेली आग्रा भेट अशा संकट काळात जिजाऊंची स्वराज्य चालक म्हणून महत्त्वपूर्ण भूमिका होती . या कठीण परिस्थितीत जिजाऊंनी शिवरायांच्या अनुपस्थितीत मोठ्या कौशल्याने स्वराज्याचा कारभार सांभाळला . शिवभारत ग्रंथामध्ये जिजाऊंचा , ''महासाध्वी विजयवर्धीनी जिजाऊ ही यादव राजांची नंदिनी पृथ्वीतलावर जागृत आहे'' असा उल्लेख केलेला आहे . शहाजीराजांनी आणि शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेसाठी सुलतानी सत्तांच्या विरोधात मिळवलेल्या विजयाच्या जिजाऊ या प्रेरक व द्योतक आहेत . या थोर मातेला स्वराज्याचा स्थापना पुत्र स्वराज्याचा छत्रपती , मराठा पातशाहा होताना पाहण्याचे भाग्य लाभले . मासाहेब जिजाऊंच्या आणि अखंड महाराष्ट्राच्या आशीर्वादाने शिवराय रायागडावर राज्याभिषेक करून स्वतंत्र राज्याचे छत्रपती झाले . अखेर १७ जून १६७४ किल्ले रायगड त्यांच्या स्वराज्यमध्ये शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला अवघे बारा दिवस झालेले असताना निधन झाले .

**सिंदखेडराजी । तेजस्वी तो तारा**
**जाधवांच्या घरा । जिजाबाई**
**लखुजीच्या पोटी । ते देदीप्यमान**
**रत्नची जन्मून । प्रकटले**
**अर्धांगिनी शोभे । शूर वीर बाला**
**राजा शहाजीला । कुलवंत**
**पुणे नगरीला । नावरूप आले**
**भाग्यची लाभले । रयतेला**
**अन्यायाची चीड । कोण ते वारील**
**अबलांवरील । अत्याचार**
**गुरु तू होऊन । तेज:पुंज बाळा**
**तूच आकारीला । शिवबाला**
**स्वतंत्र स्थापावे । स्वराज्य आपुले**
**स्वप्न दाखवले । मनोहारी**
**कार्य तुझे थोर । कसे फेडू ऋण**
**मऱ्हाठा म्हणून । अभिमानी**
**माता तू साऱ्यांची । कन्यकाही तूचि**
**या महाराष्ट्राची । पराक्रमी**
**शिष झुकवून । त्रिवार नमन**
**स्पर्शून चरण । मी पावन**
**अशा या थोर मातेस त्रिवार नमन !!**



**अश्विनी डोळस-बनसोडे**
ग्राम महसूल अधिकारी, बीड
मार्गदर्शन : चंद्रकांत शेळके, तहसीलदार, बीड

# कोकरसा शिवारात अवैध वाळू मुरूमचे उपसा करणारे वाहन पकडले

**मंठा । प्रतिनिधी**

मंठा तालुक्यातील कोकरसा शिवारात शुक्रवार १० रोजी जिल्हास्तरीय भरारी पथकाने पकडुन शासकीय गोदामात जमा केले सविस्तर असे की शासनाचा महसूल बुडू नये अवैध उत्खनन थांबावे यासाठी जिल्हाधिकारी मा श्रीकृष्ण पांचाळ, अप्पर जिल्हाधिकारी रिता मैत्रावार यांचे मार्गदर्शनाखाली जिल्हास्तरीय भरारी पथके तयार करण्यात आली त्या पथकाने सदर कार्यवाही केली तालुक्यातील कोकरसा शिवारात गट क्र ३२अवैध मुरूम उत्खनन करून भरलेले ट्रॅक्टर पथकाच्या निदर्शनात आले तसेच कोकरसा बेलोरा चोउफुलिवर वाळूचे टिप्पर एम एच २१ बी एच ४०१८ आढळले ते ही ताब्यात घेतले सध्या वाळू उत्खननाचे कायदेशीर परवाने दिले नसल्याने हा सर्व प्रकार बे कायदेशीर असल्याने सदर



कार्यवाही केली जात आहे पुढेही अशीच सुरू राहील या पथकात जिल्हा भरारी अधिकारी लक्ष्मीकांत खलिकर पथक प्रमुख ,(नायब तहसिलदार),परतूर ,व्यंकट दनडेवार सुरेश खणपटे पी एस सईद जी जी काळे आदि सह मंठा तहसीलदार श्रीमती जोंधळे मॅडम, ग्राम महसूल अधिकारी नितीन चिंचोले तमशेटे मंडल अधिकारी श्रीकांत गादेवाड ग्राम महसुल अधिकारी शिंगणे पचांगे कांबळे चालक दत्ता लवंगरे आदींचा समावेश आहे तर जिलास्तरीय पथकात जेसीबी चालक राम अच्युत राठोड यांनी दिलेल्या जबाबानुसार जेसीबी क्र ,२१ ४८८७ मालक गजानन तुकाराम चव्हाण (बलोरा) तर दुसरे मुरूम ट्रॅक्टर क्र ,,,२८ ,७६१० चे मालक संदीप विष्णु राठोड़ ,बेलोरा आणि (नंबर प्लेट नसलेले) शाम जनार्दन जाधव बेलोरा आदि असल्याचे समजले.

# विद्या मंदिर इंग्लिश स्कूलला वकृत्व स्पर्धा

दिंद्रुड । प्रतिनिधी

दिंद्रुड येथील विद्यामंदिर इंग्लिश स्कूल ला राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद व सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त वकृत्व स्पर्धेचे आयोजन शनिवारी सकाळी करण्यात आले होते.बालचिमुकल्यांनी आपल्या अबोल भाषेत स्वामी विवेकानंद, राजमाता जिजाऊ व सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतींना या प्रसंगी उजाळा दिला.

हभप बालासाहेब ठोंबरे यांच्या अध्यक्षतेखाली या वकृत्व स्पर्धेस शाळेचे अध्यक्ष बळीराम पारेकर, पत्रकार संतोष स्वामी यांची प्रमुख उपस्थिती याप्रसंगी होती. ज्युनिअर केजी ते इयत्ता तिसरीत शिकणार्या विद्यार्थ्यांनी स्वामी विवेकानंद, राजमाता जिजाऊ व सावित्रीबाई फुले यांच्या जन्मा पासून मृत्यू पर्यंतच्या प्रवासात केलेल्या कार्याचा लेखाजोखा अबोल वाणीतून मांडला. अक्षरा तोंडे, सार्थक बडे, वेदिका कटारे, श्रावणी मुळे,शरयु जाधव सह रूही बडे,ऋतीका सोनवणे, अमृता पांढरे,गौरी मुसळे या नऊ विद्यार्थ्यांनी दोन गटात प्रथम, द्वितीय तृतीय व उत्तेजनार्थ बक्षीस यावेळी पंचांच्या निर्णयानुसार घोषित करण्यात आले.राजमाता जिजाऊ व सावित्रीबाई फुले यांच्या पोशाख परिधान केलेल्या विद्यार्थीनींनी कार्यक्रमाची शोभा वाढवली.सुत्रसंचालन सहशिक्षिका पल्लवी शिंदे व आभार मोहिनी कटारे यांनी मानले.

# बिबट्याचा बंदोबस्त होत नसल्याने शेतकऱ्यात भीतीचे वातावरण

**मंठा । प्रतिनिधी**

**मंठा तालुक्यातील उस्वद आणि हनवतखेडा शिवारात बिबट्यांच्या वावरामुळे शेतकरी आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. पूर्णा नदीकाठी वसलेल्या या गावात मागील काही दिवसांपासून बिबट्यांचे दर्शन झाले आहे. काही शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की हे बिबट्ये नसून मादा वाघिण आणि तिची दोन पिल्ले आहेत. या प्राण्यांनी काही कुत्रे आणि जनावरे फाडल्याच्या घटना घडल्या आहेत.**



हनवतखेडा शिवारातही बिबट्यांचे वास्तव्य असून, मागील आठवड्याभरापासून अनेकांनी त्यांना बघितले आहे. या प्राण्यांच्या वाढत्या धोक्यामुळे शेतकरी रात्री शेतात जाण्यास घाबरत आहेत, तर महिलाही दिवसा शेतात जाण्यास टाळाटाळ करत आहेत, परिणामी शेतीची कामे खोळंबली आहेत. दौंड यांना योगेश गणगे व वसंत राऊत यांनी विचारले असता, दौंड यांनी म्हटले आहे की, सध्याच्या परिस्थितीत बिबट्यांना पकडण्यासाठी पिंजरा लावता येणार नाही आणि त्यांना पकडून कुठे सोडावे याचा निर्णय झाल्याशिवाय कोणतीही कारवाई करता येणार नाही. नागपूर कार्यालयात विचारल्याशिवाय आम्हाला निर्णय घेता येत नाही. प्रशासनाच्या या भूमिकेमुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे, आणि ते लवकरात लवकर ठोस उपाययोजना करण्याची मागणी करत आहेत, कारण त्यांना भीती आहे की एखाद्या माणसाचे प्राण जाण्याची वेळ येऊ नये.

## पान १ वरून...

### गोकुळची म्हैस दूध खरेदी

शेतकऱ्यांना प्रति लीटर ५४.८० रुपये दर मिळणार आहे. कोल्हापूरसह जिल्ह्याबाहेरील दूध उत्पादक शेतकऱ्यांनाही या दरवाढीचा फायदा होणार आहे. शुक्रवारी (दि.१०) कोल्हापूर जिल्ह्यातील नुतन मंत्र्यांच्या सत्कार समारंभात अध्यक्ष अरुण डोंगळे यांनी या दरवाढीचे सुतोवाच केले होते.

------------

### तिजोरीत खडखडाट; मद्याच्या

करण्यात आलेली समिती अन्य राज्यातील मद्य निर्मिती धोरण, परवाने, उत्पादन शुल्क आणि कर संकलन वाढीसाठी करण्यात आलेल्या उपाययोजनांवर अभ्यास करणार आहे. या समितीमध्ये पाच सदस्यांचा समावेश आहे. तर अभ्यासासाठी दोन महिन्यांचा कालावधी या समितीला देण्यात आला आहे. दोन महिन्यानंतर ही समिती अभ्यास करून अहवाल राज्य सरकारला देणार आहे. या अहवालानंतर राज्य सरकार मद्यावरील करातील वाढीबद्दल निर्णय घेण्याची शक्यता वर्तवली जात आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुती सरकारकडून विविध लाडक्या योजना राबवल्या गेल्या. परिणामी राज्याच्या तिजोरीवर त्याचा भार पडला. त्यातून तूट निर्माण होऊ लागली. ही तूट भरून काढण्यासाठी महायुती सरकारकडून वसूलीचे वेगवेगळे मार्ग शोधले जात आहेत. यापूर्वी मुद्रांक शुल्कात वाढ करण्यासोबतच पाणीपट्टी थकबाकीचा सातबारावर बोजा लावण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला होता. दरम्यान कोविड १९ नंतर राज्याची आर्थिक घडी काहीशी विस्कटली होती. ती घडी व्यवस्थित बसवण्यासाठी राज्य सरकारने मद्यविक्रीच्या माध्यमातून मोठा महसूल मिळवला होता. त्यानंतर आता पुन्हा एकदा राज्य सरकार मद्य सेवन करणाऱ्यांवर भार वाढवण्याच्या तयारीत असल्याचे बोलले जात आहे.

**विदेशी मद्य महागण्याची शक्यता**

महायुती सरकार महसूल वाढवण्यासाठी मद्याच्या आयात करात वाढ करू शकते. तसेच मद्यविक्रीच्या परवान्यासाठी जे शुल्क आकरण्यात येते, त्यामध्ये वाढ करण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. तसेच परवान्याच्या रिव्हन्यूसाठी आकरण्यात येणाऱ्या शुल्कात वाढ होऊ शकते. त्यामुळे मद्यप्रेमीवर आर्थिक भार पडणार आहे.

--------------

### पुणे कोयता गँगचे बीड कनेक्शन;

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक शेख उस्मान यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा रचून गेवराई येथे गोरख सातपुते, तात्याराव उर्फ वैभव विकास पहाडे यांना ताब्यात घेतले. यावेळी त्यांच्याकडून एक रिक्षा, तलवार, चाकू, कोयता असे हत्यारे जप्त करण्यात आले आहेत.

-------------

### वाल्मिक कराडसोडता सुदर्शन

शेवटी सुदर्शन घुलेसह प्रतीक घुले, सुधीर सांगळे, कृष्णा आंधळे, विष्णू चाटे, महेश केदार, सिद्धार्थ सोनावणे आणि जयराम चाटे यांच्यावर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली. मात्र खंडणी प्रकरणात अटकेत असलेले वाल्मिक कराड यांच्यावर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली नाही. त्यामुळे आता कराड यांच्यावर कारवाई का करण्यात आली नाही, असा प्रश्न आता उपस्थित केला आहे.

---------

### पाणीटंचाईच्या कृती आराखड्यात

निवारण करण्यासाठी वेळेअगोदर नियोजन करणे गरजेचे आहे. त्याअनुषंगाने जानेवारी २०२५ ते जून २०२५ या कालावधीतील होणार्या पाणीटंचाईच्या निवारणासाठी कृती आराखडा तयार करून त्यामध्ये बीड मतदारसंघात क्षेत्रातील गाव आणि वाडी, वस्त्यांवर नवीन हातपंप बसवणे, बोअरवेल घेणे, जुन्या हातपंपाची दुरूस्ती करणे, बंद बोअरवेल सुरू करणे आदी बाबी सामाविष्ट करण्याची मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी केली आहे. आ.क्षीरसागर यांनी बीड आणि शिरूर कासार तालुक्यातील १६७ गावे, वाडी आणि वस्त्यांची यादीच जिल्हा प्रशासनाकडे पाठविली असून यादीतील नमूद ठिकाणांवर पाण्याचे नियोजन करावे असे सांगितले आहे. याबाबत आ.संदीप क्षीरसागर यांनी जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे पत्रव्यवहार केला आहे.

--------------

### मंत्री आठवलेंची रिपाइं

केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री आणि रिपाईचे अध्यक्ष रामदास आठवले म्हणाले की, दिल्ली विधानसभा निवडणुकीत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आम आदमी पक्षाला सत्तेवरून दूर करण्यासाठी काम करेल आणि दिल्लीत काँग्रेसला पुन्हा शून्य जागांवर रोखण्यासाठी काम करेल. दिल्ली विधानसभेत आम्ही १५ जागा लढवत आहोत, उर्वरित सर्व जागांवर आम्ही भाजपला समर्थन देत आहोत. भाजप दिल्लीत ऐतिहासिक बहुमताने सरकार स्थापन करेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. या विधानसभा निवडणुकीत जनता आम आदमी पक्षाच्या सरकारला हाकलून लावेल. त्यांच्या दररोज नवीन भ्रष्टाचाराच्या कृत्यांनी दिल्लीतील लोक त्रासले आहेत, असेही आठवले म्हणाले.

--------------

### वाल्मिक कराडकडून हार्वेस्टरच्या

कराडला अटक झाल्यानंतर आता त्याचा हा प्रताप समोर आला आहे. सोलापूरसह राज्यातील १४० ऊस तोडणी यंत्र मालकांना ११ कोटी २० लाख रूपयांचा गंडा वाल्मिक कराड याने घातल्याचा आरोप पंढरपूर येथील शेतकरी दिलीप नागणे यांनी केला आहे. दिलीप नागणे हे हार्वेस्टिंग मशीनच्याद्वारे ऊस तोडणीचे काम करतात. या मशिनला प्रत्येकी ३६ लाखाचे अनुदान देतो, असे सांगून वाल्मिक कराड याने या मशीन मालकांना प्रत्येकी आठ लाख रुपये देण्याचे सांगितले होते. तत्कालीन कृषीमंत्री हे माझे जवळचे असून तुम्हाला अनुदान मिळवून देतो, तुम्ही फक्त रोख रक्कम घेऊन माझ्याकडे या, असे कराड यांनी सांगितल्याचे दिलीप नागणे यांनी सांगितले.

-----------

### सुरेश धस यांनी

शिवसेना, भाजपा अशा पक्षांच्या नेत्यांनी धनंजय आणि पंकजा मुंडे यांच्याविरोधात मोर्चा उघडला आहे. तर पंकजा मुंडे यांनी सुरेश धस यांच्यावर जिल्ह्याची बदनामी केल्याचा पलटवार केला आहे. सुरेश धस यांनी बीडला बदनाम केले, ते यापुर्वी का बोलले नाही, आताच त्यांना सगळ कसे आठवले असा टोलाही पंकजा मुंडे यांनी लगावला. गृह विभागाने निर्णय घेतला आहे तर त्यांनी आश्वासन दिले आहे की कारवाई करणार आहेत, एका तरुणाची निर्घृण हत्या झाली. ज्यांना राजकारण करायचे ते करत आहेत, असे त्या म्हणाल्या. अजित दादा उपमुख्यमंत्री आहेत, त्यांच्या पक्षाचे ते प्रमुख असून त्यांनी अगोदरच सांगितले आहे की तपासात दोषी आढळल्यास कारवाई केली जाईल, आताच राजीनामा देण्याचा संबंध नाही, असे त्यांनी सांगितल्यावर त्यावर मी माझे मत व्यक्त करण्याची गरज नाही, असेही मुंडे म्हणाल्या.

**मी फक्त परळीवर बोललो-धस**

मी आतापर्यंत फक्त परळीतील गुंडगिरीवर बोललो आहे. बीड जिल्ह्याचा यात संबंध कुठे येतो? मी परळी पॅटर्नवर बोललो, अशी प्रतिक्रिया आ. सुरेश धस यांनी दिली.

**काय म्हणाल्या पंकजा मुंडे?**

मी महिला म्हणून काम केले, केशरकाकू, प्रितम मुंडे सगळ्या महिलांनी काम केले. ज्या जिल्ह्यातून सगळ्यात जास्त ऊस तोड कामगार जातात, त्याला बदनाम करण्यात आले. गुन्हेगारी लोक असते तर दरोडे घातले असते. माझ्याकडे प्रत्येक जिल्ह्याचा रेकॉर्ड आहे, मुळशी पॅटर्नच्या घटना आहेत. नागपूरमध्ये महिलेला पायावर नाक घासून माफी मागायला लावले जाते, असे त्या म्हणाल्या. धस यांच्यावर काय बोलू? मी कुठं गप्प आहे. मी एसआयटीची मागणी केली होती. पहिली मागणी मी केली. माझ्या बोलण्यामुळे राज्य हलले असते तर आत जे ते बोलताय ते पूर्वी का बोलले नाही. मागच्या २ वर्षात का बोलले नाही, असा सवाल पंकजा मुंडे यांनी सुरेश धसांना केला. तसेच सुरेश धस यांनी बीडला बदनाम केले असल्याचे त्या म्हणाल्या.

-------------

## ऑनेस्टी शाळेत सातत्याने विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळते -स्मिता रविन्द्र कानडे

**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील ऑनेस्टी युनिट २ छत्रपती शिवाजी नगर शाळेत कर्तृत्ववान महिलांच्या हस्ते आनंदनगरी चे उद्घाटन करण्यात आले..यावेळी मंगलनाथ महिला सक्षीमीकरण च्या संचालिका स्मिता रविन्द्र कानडे, श्री केशवराज अर्बन च्या संचालिका स्वाती प्रशांत आगे, आदित्य कोचिंग क्लासेसच्या संचालिका पाटिल मॅडम यांनी महिला पालकांना मार्गदर्शन केले..

यावेळी शाळेतील सर्वच महिला पालकांनी स्टॉल सजवून खाण्याचे पदार्थ ठेऊन उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.परिसरातील विद्यार्थी,पालकांनी सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुप्रिया गरुड यांनी केले.तर आभार प्रदर्शन शाळेच्या प्रिन्सिपल अमृता तोर यांनी मानले.पाहुण्यांचे स्वागत सांस्कृतिक प्रमुख प्रभा हरकळ सुशीला जोशी,श्रुती कुलकर्णी,अस्मिता टाक यांनी केले.

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
रविवार, दि. १२ जानेवारी २०२५


# संघर्षातूनच दिव्यत्व प्राप्त होते - ना.पंकजाताई मुंडे

## स्वामी विवेकानंद यांनी भारतीयांचे आत्मभान जागृत केले -प्रा.अभय भंडारी; दीनदयाळ बँकेची युगपुरूष स्वामी विवेकानंद व्याख्यानमाला

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**दीनदयाळ नागरी सहकारी बँकेच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही १० जानेवारी ते १२ जानेवारी २०२५ या कालावधीत तीनही दिवस दररोज सायंकाळी ६.३० वाजता युगपुरूष स्वामी विवेकानंद यांच्या १६२ व्या जयंतीनिमित्त व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. पहिल्या दिवशी प्रसिद्ध व्याख्याते प्रा.अभय भंडारी यांनी स्वामी विवेकानंद आणि भारतीय राष्ट्रवाद या विषयावर आपले मौलिक चिंतन मांडले. व्याख्यानमालेचे उद्घाटन बँकेच्या संचालिका तथा राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते करण्यात आले.**

कार्यक्रमाची सुरूवात भारतमाता, स्वामी विवेकानंद, पंडित दीनदयाळजी उपाध्याय यांच्या प्रतिमापूजन आणि दीपप्रज्ज्वलनाने करण्यात आली. बँकेच्या वतीने मान्यवरांचा यथोचित सन्मान करण्यात आला. तर यावेळी बँकेचे संस्थापक प्राचार्य राजाभाऊ धाट यांच्या ८१ व्या वाढदिवसानिमित्त त्यांचे मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते अभिष्टचिंतन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर प्रमुख व्याख्याते प्रा.अभय भंडारी, भाजपाचे युवा नेते अक्षय मुंदडा, बँकेचे अध्यक्ष ॲड.मकरंद पत्की, उपाध्यक्ष ॲड.राजेश्वर देशमुख, तर प्रमुख अतिथी म्हणून रोटरी क्लबचे सचिव धनराज सोळंकी, छत्रपती राजर्षी शाहू महाराज पतसंस्थेचे अध्यक्ष राजू मोरे आणि दीनदयाळ बँकेचे संचालिका सौ.शरयूताई हेबाळकर, सर्व संचालक श्री इंजि.बिपीन क्षीरसागर, मकरंद कुलकर्णी सोनेसांगवीकर, प्रा.अशोक लोमटे, प्रा.जयकरण सुरेशकांबळे, डॉ.विवेक दंडे, चैनसुख जाजू, तज्ज्ञ संचालक ॲड.अशोक कुलकर्णी, महादेव ईटके व मुख्यकार्यकारी अधिकारी सनतकुमार बनवसकर आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उद्घाटक म्हणून बोलताना ना.पंकजाताई मुंडे यांनी सांगितले की, संघर्षातूनच दिव्यत्व प्राप्त होते. याची प्रचिती स्वामी विवेकानंद यांच्या जीवन कार्यातून पुढे येते. आज राष्ट्र महासत्तेकडे वाटचाल करीत असतानाही त्यांचे विचार दिशादर्शक ठरत आहेत. प्रत्येक युगात एक युगपुरूष जन्माला येत असतो. त्याचे विचार हे चिरकाल जगाला मार्गदर्शक ठरत असतात. स्वामी विवेकानंद यांचे विचार



युवकांना कायम प्रेरणादायी ठरणारे आहेत. असे सांगून त्यांनी दीनदयाळ बँक व्याख्यानमालेच्या माध्यमातून प्रबोधनाची चळवळ अखंडितपणे राबवित असल्याचे कौतुक ही राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.मुंडे यांनी केले. तर प्रथम पुष्प गुंफताना विवेकानंद- आणि भारतीय राष्ट्रवाद हा विषय अतिशय समरसतेने गुंफताना प्रा.अभय भंडारी (विटा जि. सातारा) यांनी सांगितले की, स्वामीजींनी भारतीय स्वातंत्र्याचा आणि आर्थिक सबलीकरणाचा पुरस्कार केला. राष्ट्र हेच ईश्वर माना असा मौलिक संदेश दिला. स्वामीजींच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव संबंध जगावर पडला. ज्ञान आणि साधना हे मार्ग स्वामीजींनी दाखवले. त्यांनी आत्मबलाचे महत्त्व पदोपदी विषद केले. १२०० वर्षे गुलामगिरी अनुभवलेला भारतीय समाज मानसिकदृष्ट्या खचला होता. तेव्हा स्वामी विवेकानंद यांनी देशभर भ्रमंती करून अस्थिपंजर झालेल्या भारतीयांशी संवाद साधला. त्यांना जाणून घेतले. त्यांचे मनोबल वाढविले. अमेरिकेच्या शिकागो येथील जागतिक धर्म परिषदेत ७ हजार प्रतिनिधींसमोर हिंदू धर्म व संस्कृतीचे दर्शन घडविले. हिंदू धर्माचे चिंतन मांडले. कर्म सिध्दांत सांगितला. चारित्र्य, राष्ट्रप्रेम यांचा पुरस्कार केला. युवकांनी सत्य आणि निर्भयता आत्मसात करावी असा विचार मांडला. आत्म्याची शुध्दता, पावित्र्य, सकारात्मक विचार, सत्याचा आग्रह धरला. विविध उदाहरणे देत प्रा.भंडारी यांनी तत्कालीन भारतीय जनतेचे आत्मभान जागृत करण्याचे काम स्वामी विवेकानंद यांनी केले असे प्रतिपादन केले. प्रा.भंडारी यांनी तपशीलवार, मुद्देसूद, प्रवाही व अभ्यासपूर्ण चिंतन मांडले. त्यामुळे उपस्थित रसिक - श्रोत्यांना प्रा.भंडारी यांचे व्याख्यान मनापासून भावले, आवडले. म्हणून रसिक - श्रोत्यांनी ही उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सुरूवातीला कार्यक्रमाचे प्रास्ताविक बँकेचे उपाध्यक्ष ॲड.राजेश्वर देशमुख यांनी केले. तर पाहुण्यांचा परिचय संचालक इंजि.बिपिन क्षीरसागर यांनी करून दिला. सुत्रसंचलन संचालक मकरंद कुलकर्णी सोनेसांगवीकर यांनी केले. तर उपस्थितांचे आभार तज्ज्ञ संचालक ॲड.अशोकराव कुलकर्णी यांनी मानले. वैशालीताई विडेकर यांनी पद्य सादर केले. तर संचालिका शरयूताई हेबाळकर यांनी पठन केलेल्या शांती मंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी अंबाजोगाईतील विविध क्षेत्रातील मान्यवर, महिला भगिनी, ज्येष्ठ नागरिक, युवक, रसिक श्रोते उपस्थित होते. आयोजित व्याख्यानमालेत शनिवार, दि.११ जानेवारी रोजी प्रकाश पाठक (धुळे) यांचे 'पंचप्रण' - सामाजिक परिवर्तनाची गुरूकिल्ली या विषयावर व्याख्यान होईल. बँकेच्या वतीने दि.११ जानेवारी रोजी सहकार भारती स्थापना दिवस ही साजरा करण्यात येईल. या प्रबोधनपर व्याख्यानमालेचा समारोप रविवार, दि.१२ जानेवारी रोजी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते भिकुजी दादा इदाते (दापोली) यांच्या 'सामाजिक आचारसंहितेची गाथा - संविधान' या विषयावरील व्याख्यानाने होईल. तसेच १२ जानेवारी रोजी युगपुरूष स्वामी विवेकानंद यांची जयंती बँकेच्या वतीने साजरी होईल. अंबाजोगाई शहर व परिसरातील रसिक, श्रोते, नागरिक, माता, भगिनी आणि युवक वर्गाने सहकुटूंब सहपरिवार उपस्थित राहून युगपुरूष स्वामी विवेकानंद व्याख्यानमालेचा लाभ घ्यावा असे आवाहन दीनदयाळ नागरी सहकारी बँकेच्या वतीने करण्यात आले आहे.

## चाचा नेहरु जिल्हास्तरीय बाल महोत्सव अंतर्गत मैदानी खेळांच्या स्पर्धाचे मन्सुरी अन्सार निसार यांच्या हस्ते उदघाटन

बीड । प्रतिनिधी

जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय बीडच्या वतीने आयोजित चाचा नेहरु जिल्हास्तरीय बाल महोत्सव अंतर्गत मैदानी खेळांच्या स्पर्धाचे उदघाटन जिल्हा अधिक्षक मन्सुरी अन्सार निसार अहमद व जिल्हा परीविक्षा अधिकारी मंगेश जाधव यांच्या हस्ते शुक्रवारी दि.१० जानेवारी रोजी करण्यात आले.



चाचा नेहरू जिल्हास्तरीय बाल महोत्सव अंतर्गत मैदानी खेळांचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे आज जिल्हा अधिक्षक मन्सुरी अन्सार निसार अहमद व जिल्हा परीविक्षा अधिकारी मंगेश जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विनोद भोसले संरक्षण अधिकारी ,तालुका संरक्षण अधिकारी उकरे पाटील, पी ओ कांबळे,लहु राऊत, शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉक्टर चौगुले शेटीबा व क्रीडा शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिवाजी महाविद्यालयात व्यवसाय मार्गदर्शन शिबिर संपन्न

हिंगोली । प्रतिनिधी

येथील शिवाजी महाविद्यालयात मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत जिल्हा उद्योग केंद्र व शिवाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने व्यवसाय मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले. यावेळी जिल्हा उद्योग केंद्राचे प्रकल्प अधिकारी तज्ञ मार्गदर्शक मा. सुधीरजी आठवले म्हणाले की, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत राज्य शासनाच्या भक्कम सहकार्याने तरुण-तरुणींना नवीन उद्योजक बनण्याची सुवर्णसंधी निर्माण झाली आहे. सूक्ष्म व लघु उपक्रमांना चालना देण्यासाठी तसेच व्यापक प्रमाणात



रोजगाराच्या संधी स्थानिक ठिकाणी उपलब्ध होण्यासाठी ही योजना आहे. अलीकडच्या काळात चांगली संधी असणारे करिअर म्हणजे स्वयंरोजगार आहे. विद्यार्थ्यांनी व्यवसाय अथवा उद्योग क्षेत्राकडे वळावे त्यांना हिंगोली जिल्हा उद्योग केंद्राकडून सहकार्य केले जाईल. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब क्षीरसागर म्हणाले की, विद्यार्थ्यांना अनेक क्षेत्र उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांना ज्या क्षेत्रात काम करण्याची आवड आहे त्या क्षेत्राची निवड करून त्या क्षेत्रातील शिक्षण व प्रशिक्षण घेतल्यास करिअर करताना अडचणी जात नाही. जे क्षेत्र निवडाल त्या क्षेत्रात सर्वोच्च स्थानी पोहोचण्याची विद्यार्थ्यांना जिद्द असली पाहिजे त्यासाठी त्यांनी प्रयत्नाची पराकाष्टा करण्याची आवश्यकता आहे. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब क्षीरसागर हे होते तर विचारमंचवर तज्ञ मार्गदर्शक म्हणून हिंगोली जिल्हा उद्योग केंद्राचे प्रकल्प अधिकारी श्री. सुधीरजी आठवले, कार्यक्रमाचे संयोजक सुभाष बोरकर, राष्ट्रीय सेवा योजनाचे कार्यक्रमाधिकारी प्रा. संजय चव्हाण प्रा. आशिष इंगळे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. किशोर इंगोले यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा. धाराशिव शिराळे यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. संजय चव्हाण यांनी केले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

पान ६ वरून...

### खो स्पर्धेत मुलांच्या गटात

खो-खो स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. मुलांच्या गटात १४ वर्षं व १७ वर्ष वयोगटात स्पर्धेमध्ये सर्व साखळी सामने झाल्यानंतर जयभवानी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय गढी विरुद्ध शिवशारदा पब्लिक स्कूल शिवाजीनगर यांच्यात अंतिम सामना झाला. यात शिवशारदा पब्लिक स्कूलच्या संघाने अप्रतिम खेळी करत जयभवानी विद्यालयाचा पराभव करून विजेतेपद पटकावले. संघातील १७ वर्ष वयोगटात सार्थक पवार, कार्तिक वाघ, रोहित चाळक, पृथ्वीराज डरफे, सौरव चव्हाण, श्रीधर साबळे, अथर्व काळे, सागर तांगडे, शांतनू राज पवार, नुमान बागवान, कृष्णा माकुडे, सार्थक दाभाडे कामगिरी केली. क्रिडाशिक्षक ज्ञानेश्वर धापसे, श्रीमती विद्या राठोड यांचे मार्गदर्शन लाभले. वयोगट १४ मध्ये शिवशारदाचा संघ विजेता ठरला. या संघात यशराज तिपाले, स्वार्थीक वाघ, सार्थक घोडके, संस्कार थावरे, यश हत्ते, स्वातंत्र्य शेळके, कार्तिक काळे, पृथ्वीराज लोणकर, विजय शिंदे, नुमान पठाण, श्रेयस तिपाले, कार्तिक घोडके, रोहन कबाडे यांनी सहभाग घेतला. त्यांना क्रीडा शिक्षक ज्ञानेश्वर धापसे यांचे मार्गदर्शन लाभले.

उपविजेतेपद जयभवानी विद्यालयाच्या संघाने पटकावले. १४ वर्ष वयोगटात संघातील खेळाडू धनवडे रुद्र,

वरवडे अभिषेक, पवार पवन, तळतकर सार्थक, आरसूळ ऋषिकेश, आजबे सक्षम, चौधार विराट, चव्हाण प्रिन्स, जाधवर संस्कार, तिवारी सुरज, चौधरी समर्थ, मनोहर जयवंत या विद्यार्थ्यांचा सहभाग होता. १७ वर्ष वयोगटात मुले

लोणकर सचिन, सपकाळ समर्थ, वाळेकर पवन, पवार अभिषेक,राऊत ओमकार, सातपुते सुमित, जाधव धनराज, येवले कुणाल, जाधव निखिल, घाटे सुजल, चोरमले सुरज, जाधव युवराज,भावले महादेव यांनी उत्कृष्ट कामगिरी करत उपविजेतेपद पटकावले. त्यांना मुख्याध्यापक वसंत राठोड, क्रीडा शिक्षक गिरी, आडे आणि रमेश देशमुख यांचे मार्गदर्शन लाभले.

तृतीय विजेता ठरला शारदा विद्या मंदिर गेवराईचा संघ. १४ वर्ष वयोगटात जाधव ऋषिकेश, काळे कृष्णा,मोटे हर्षद, पघळ राजवर्धन, नवले प्रथमेश, शिंदे शौर्य, उंछैया सार्थक, काकडे हर्षवर्धन, हिंगे श्रवण, राठोड शिवम, सागडे संजय, तारक आदित्य या खेळाडूंचा समावेश होता तर १७ वर्षे गटात कर्हे मोहित, खेडकर शिवम, जाधव रोहन, मडावी पियुष, बोराडे क्षितिज, चव्हाण पृथ्वीराज, कापरे सुबोध, शेख साकीब, चव्हाण प्रताप, म्हेत्रे सार्थक, कातकडे प्रथमेश नाटकर, कार्तिक संतोष यांनी चांगली कामगिरी केली. त्यांना मुख्याध्यापक पवार, क्रिडा शिक्षक पघळ यांनी मार्गदर्शन केले.

स्पर्धेचे पंच म्हणून रोहित आडे , अभिजीत हिवाळे, भरत यादव, रोहित घिगे, सिंधू माने, गणेश यादव, नवनाथ चव्हाण, विष्णुपंत घोंगडे, वेदांत काळे, प्रा. बोरवडे, देविदास गिरी, गणपत डोंगरे, विजय जाहेर, विजय अपसिंगेकर यांनी काम पाहिले. सर्व विजेत्यांना आयोजक रणवीर पंडित व युवानेते पृथ्वीराज पंडित यांनी अभिनंदन करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्थेचे सर्व मुख्याध्यापक, प्राचार्य, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मा.आ.राजेशभैय्या टोपे

आर्दड,बन्सीधर शेळके,शिवराम गुजर,सिद्धार्थ गाढे,ताहेर भाई पठाण,प्राचार्य गणेश कंटूले,संघराज गणकवार,गोपाल राजूरकर,भागवत सोळंके,करण खरात,कैलास घुमरे,स्वप्नील तौर,धनंजय देशमुख,शरद बहिर आदी कार्यकर्त्यांची यावेळी उपस्थिती होती.

### पिंपळ्यात पिर गैबीसाहेब यात्रा

वतीने कुस्त्यांचे आयोजन करण्यात आले होते.बीड जिल्ह्याच्या मुलीने कुस्तीच्या माध्यमातुन नाव रोषण करण्याचं काम केलं. त्याच पद्धतीने मुलांनी सुद्धा वेसणाच्या आहारी न जाता घरघरात पैलवांन निर्माण झाला पाहिजे याच्यासाठी कुस्त्याचे आखाडे भरवले जातात असे नवतरुणांना आवाहन सरपंच केशवराव आंधळे यांनी केले.यावेळी गावातील सरपंच,उपसरपंच,चेअरमन, पोलिस कॉन्सटेबल,ग्रामपंचायत सदस्य, पोलिस पाटिल,सोसायटी सदस्य,तंटामुक्ती अध्यक्ष,तरुण गावकरी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.यात्रा उत्सव पार पाडण्यासाठी गाव कमिटीने महत्वाची भुमिका पार पाडली.

### बोडखे, बबलु, कुमकर

डा.सौ.मंजूषा टेकाडे,आदर्श सेवक पुरस्कार- रोकडे शहादेव (मामा), तसेच गुणवंत विद्यार्थी बक्षीस वितरण होणार आहे.या गौरव सोहळ्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन आदर्श शिक्षिका तथा कवीयत्री श्रीमती शेख नजमा मैनुद्दीन श्री समीर सर,शेख नईम,श्री शेख नदीम यांनी केले आहे.

## स्व. प्राचार्य भ. कि. सबनीस राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत कॉकसिट महाविद्यालय, लातूरच्या संघाला सांघिक विजेते पद

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

येथील स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र विभागाने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत लातूर येथील कॉकसिट महाविद्यालयाच्या संघाने प्रथम पारितोषिक मिळविले सोनवणे अभिजित व कु. अरब बुशरा यांच्या संघाने सांघिक सर्वोत्कृष्ट कामगिरी केली तर नवलमल फिरोदिया विधी महाविद्यालय, पुणे येथील साईराज मोहन घाटपांडे यांने या स्पर्धेतील वैयक्तिक प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकाविले. एम. पी. विधी महाविद्यालय, छ. संभाजी नगर च्या संघाला सांघिक द्वितीय तर धाराशिव येथील डॉ. बापुजी साळुंखे विधि महाविद्यालयाच्या संघाने सांघिक तृतीय क्रमांक पटकावला. कॉक्सिट महाविद्यालय लातूरच्या



कु. अरब बुशरा हीने वैयक्तिक द्वितीय व याच महाविद्यालयाच्या सोनवणे अभिजित याने तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळविले . यशवंत महाविद्यालय, नांदेडच्या शिंदे व्यंकट याला उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले.

अंबाजोगाईतील जेष्ठ पत्रकार प्रा. नानासाहेब गाठाळ यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिके वितरीत करण्यात आली. योगेश्वरी शिक्षण संस्थेचे संचालक प्रा. एन के. गोळेगावकर यांनी स्व. प्राचार्य भ. कि. सबनीस यांच्या आठवणी सांगितल्या . सबनीस सर विद्यार्थीप्रिय प्राध्यापक होते. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी सदैव कार्यरत असत असे मत त्यांनी व्यक्त केले या कार्यक्रमाला योगेश्वरी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष जेष्ठ कवी गणपत व्यास गुरुजी अध्यक्ष म्हणून लाभले होते त्यांनी कांहीं कविता सादर केल्या. या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेच्या परीक्षणाचे काम खोलेश्वर महाविद्यालयाचे मा. उपप्राचार्य डॉ. दिगंबर मुडेगावकर यांनी तसेच डॉ. होळकर मॅडम, सेवानिवृत्त उपप्राचार्य व्हि. एन. जोशी, भागवत मसने सर यांनी केले . डॉ. मुडेगावकर यांनी स्पर्धेच्या अत्यंत चांगल्या आयोजना विषयी मत मांडले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. सागर कुलकर्णी व प्रा. सविता बुरांडे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. रमेश सोनवळकर यांनी केले. या कार्यक्रमाला योगेश्वरी शिक्षण संस्थेचे जेष्ठ संचालक प्रा. माणिकराव लोमटे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. आर. थारकर , उपप्राचार्य डॉ.रमेश सोनटक्के पदव्युत्तर विभागाच्या संचालिका डॉ शैलजा बरुरे उपप्राचार्य जितेंद्र देशपांडे, पर्यवेक्षक प्रा. जवळगावकर, कार्यालयीन अधीक्षक श्रीहरी रामदासी, महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी, स्पर्धक विद्यार्थी उपस्थित होते.

पान ६ वरून...

### भक्ती ज्ञान वैराग्याचा त्रिवेणी

सांगितल. समग्र जीवनभर भूतलावरील जीवजंतूला ऑक्सिजन वायू पुरवणारी वाहिनी म्हणजेच आपल्या दारातील तुळस आहे या तुळशीचे आपल्या जीवनात जेवढे महत्त्व आहे त्यापेक्षाही या तुलसीमातेला भगवंताच्या गळ्यामध्ये अखंड राहण्याचा मान मिळाला तुळशी मातेच्या पुष्प माले शिवाय पंढरपुरातील भगवान पंढरीष परमात्मा पांडुरंग याची पूजा पूर्ण होत नाही असे महाराजांनी कथे मध्ये सांगितले.पंढरपूर येथील पूजा अर्चना, भागवत कथा श्रवण करण्यासाठी बीड संभाजीनगर शिरस मार्ग तसेच बीड जिल्ह्यातील असंख्य माता भगिनी व भक्तगण पंढरपूर येथे उपस्थित आहे .या ठिकाणच्या सर्व भावीक भक्तांचे राहणे, जेवण तसेच येण्या जाण्याची सोय देखील करण्यात आलेली आहे ही सर्व धुरा कृष्णा जोशी काका ,विजय महाराज जोशी व हभप धुराजी महाराज कोळेकर धुराजी महाराज कोळेकर यांच्या अथक परिश्रमाने होत आहे.

### रेल्वे विभागीय

पाटील दानवे, बद्रीनाथ पठाडे,भारतीय जनता पार्टीचे प्रदेश निमंत्रित सदस्य राजेश राऊत , विजय कामड, सोपान पेंढारकर,महानगराध्यक्ष सतीश जाधव, जिल्हा सरचिटणीस सिद्धिविनायक मुळे , आदींनी अर्जुन गेही यांचे अभिनंदन केले आहे.

### आ.धस, आ.क्षीरसागर यांना

मुंडे यांच्या कार्यकर्त्या कडून लक्ष विचलित करण्या साठी प्रयत्न सुरू आहेत. आरोप घेणारे संतोष देशमुख यांच्या बाजूने नाहीत का? सामान्य शेतकऱ्यांना पीक विमा, नुकसान भरपाई मिळावी ही भूमिका आपली नाही का? या वेळी आपेट यांनी आत्महत्या ग्रस्त शेतकऱ्यांना मदत केली का? निवडणूक काळात सर्व गावात पैसे दिले मग आत्महत्या गस्त शेतकऱ्यांना मदत का दिली नाही असा सवाल ना मुंडे यांना केला. या वेळी बोलताना मदन परदेशी म्हणाले की, सत्ताधारी मंडळींचे आरोप म्हणजे वयक्तिक स्वातंत्रावर गधा आणण्याचा प्रयत्न असून आम्ही सर्व संतोष देशमुख यांना न्याय देणाऱ्याच्या सोबत आसून धमक्या देणारावर शासनाने कठोर भूमिका घ्यावी या वेळी बोलताना उत्तम माने म्हणाले की, बीड हा गुंडांचा जिल्हा म्हणून देशभर ओळखला जात आहे. सत्तेतून पैसा व पैशातुन सत्ता हे गणित बनल्या गेले आहे. कुठलाही उद्योग जिल्ह्यात आला तर अगोदर आमची भेट घ्या असे फर्मान काढले जाते. आमच्या परळीत आम्हाला जगण्याचा अधिकार राहिलेला नाही. ट्रॅक्टर, गाडी खाली घालुन लोक मारल्या जात आहेत. वंजारा समाजात १० टक्के लुटारू आसले तरी ९० टक्के लोक चांगले आहेत. या वेळी बोलताना ईश्वर शिंदे यांनी राजेश्वर चव्हाण यांच्यावर तोफ डागली. आबा आपली ही भूमिका पाहता येणाऱ्या काळात प्रति वाल्मिक अण्णा म्हणून आम्ही तुमच्या कडे पहायचं आहे का? आबा मराठा आरक्षण मुद्यावर जिल्हाध्यक्ष पदाचा राजीनामा दिला होता मात्र परत जिल्हाध्यक्ष पद घेऊन मराठ्यांच्या जीवावरच उठला आहात. आपण शरद पवार यांना धोका दिलात आपल्या धमक्याला आम्ही आणि कोणीही घाबरणार नाहीत असेही शिंदे म्हणाले.

## बीड जिल्हा पोलीस प्रशासनचा,गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा पिंपरी चिंचवडमध्ये निषेध

**पाटोदा । प्रतिनिधी**

**स्व संतोष देशमुख यांच्या हत्येचे तपास पोलीस अधिकारी तसेच शहराचे पोलीस अधिकारी यांची चौकशी करण्याबाबत तसेच मंत्री धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेऊन मंत्रिमंडळातून हाकलून द्यावे व त्यांची चौकशी करण्यात यावी अशी मागणी पिंपरी चिंचवड येथिल समाजसेवकांनी केली आहे.**

बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथिल सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येतील पकडलेल्या सर्व आरोपींना फाशीची शिक्षा देण्यात यावी. ह्या केसचा



निकाल फास्टट्रॅक वरती घेऊन लवकरात लवकर लावण्यात यावा. ह्या प्रमुख मागण्यांसाठी. दि.८ गुरुवार रोजी तहसील कार्यालय निगडी येथे पिंपरी चिंचवड शहरातील विविध संघटनेच्या प्रमुख उपस्थितीत तसेच शिव शाहू फुले आंबेडकर चळवळीतील सर्व सक्रिय कार्यकर्ते सर्व पिंपरी चिंचवड शहरातील संघटना यांनी स्व. संतोष देशमुख. स्व. सोमनाथ सूर्यवंशी.यांच्या कुटुंबाला न्याय मिळावा यासाठी जन आंदोलन करण्यात आले. याप्रसंगी. ज्येष्ठ समाजसेवक. मा. मानवजी कांबळे, पिंपरी विधानसभा शिवसेनेचे आमदार. गौतम चाबुकस्वार. (उद्धव ठाकरे शिवसेना गट) माजी महापौर, सजोग वाघेरे साहेब(राष्ट्रवादी शरद पवार गट). माजी नगरसेवक. ज्येष्ठ समाजसेवक मारुती बापकर, संभाजी ब्रिगेड पिंपरी चिंचवड शहर अध्यक्ष. मा. सतीश काळे , काँग्रेस नेते. नरेंद्र बनसोडे. भिमशाही युवा संघटनेचे अध्यक्ष, शिवशंकर उबाळे, शांताराम खुडे त्याचप्रमाणे. भ्रष्टाचार निर्मूलन समिती महाराष्ट्र राज्याच्या वतीनेही सहभाग नोंदवण्यात आला.

cmyk




# शेतकऱ्यांना मिळणार मोठा दिलासा

## कर्जाची मर्यादा ३ लाख रुपयावरुन ५ लाख रुपये होणार?

मुंबई : २०२५ च्या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांना मोठा दिलासा देणारी बातमी मिळण्याची शक्यता आहे. १ फेब्रुवारीच्या आगामी अर्थसंकल्पात सरकार किसान क्रेडिट कार्डची मर्यादा ३ लाख रुपयांवरुन ५ लाख रुपये करण्याची तयारी करत आहे. मर्यादे संदर्भात सरकारला सतत मागण्या प्राप्त होत होत्या. त्यामुळं या मागणीच्या संदर्भातने सरकार ची मर्यादा ५ लाख रुपये करण्याची शक्यता आहे.

किसान क्रेडिट कार्ड योजना २६ वर्षांपूर्वी १९९८ मध्ये सुरू करण्यात आली होती. या योजनेंतर्गत शेती व संबंधित कामे करणाऱ्या शेतकऱ्यांना ९ टक्के व्याजाने अल्पमुदतीचे कर्ज दिले जाते. या योजनेची विशेष बाब म्हणजे सरकार कर्जावरील व्याजावर २ टक्के सूटही देते. त्याचवेळी, जे शेतकरी संपूर्ण कर्जाची वेळेवर परतफेड करतात, त्यांना प्रोत्साहन म्हणून आणखी ३ टक्के सवलत दिली जाते.

म्हणजेच हे कर्ज शेतकऱ्यांना केवळ ४ टक्के वार्षिक व्याजावर दिले जाते. ३० जून २०२३ पर्यंत असे कर्ज घेणाऱ्यांची संख्या ७.४ कोटींहून अधिक होती. ज्यावर ८.९ लाख कोटींहून अधिकची थकबाकी दिसली. शेतीच्या खर्चात लक्षणीय वाढ झाली आहे. उलट दीर्घकाळापासून शेतकऱ्यांना दिलेल्या कर्ज मर्यादेत कोणतीही वाढ झालेली नाही. बजेटमध्ये मर्यादा वाढवल्यास कृषी क्षेत्रातील उत्पादनात वाढ होईल आणि कृषी उत्पन्नातही वाढ दिसून येईल. त्यामुळे शेतकऱ्यांच्या जीवनशैलीत बदल होण्याबरोबरच त्यांना कर्जाची वेळेवर परतफेडही करता येणार आहे.



लहान शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा उद्देश

किसान क्रेडिट कार्डचा उद्देश लहान शेतकऱ्यांना दिलासा देणे हा आहे. लहान शेतकऱ्यांना अनुदानित कर्जाचीही नितांत गरज आहे. जेणेकरून त्यांचे उत्पन्नही वाढेल. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी नाबार्ड वित्तीय सेवा विभागाच्या सहकार्याने मोहीमही राबवत असल्याचे त्यांनी सांगितले. जेणेकरून पशुपालन आणि मत्स्यपालन करणाऱ्या लोकांनाही कर्ज मिळू शकेल.

किती क्रेडिट कार्ड जारी केले? : नाबार्डच्या आकडेवारीनुसार, ऑक्टोबर २०२४ पर्यंत सहकारी बँका आणि प्रादेशिक ग्रामीण बँकांनी १६७.५३ लाख किसान क्रेडिट कार्ड जारी केले आहेत. ज्यांची एकूण क्रेडिट मर्यादा १.७३ लाख कोटी रुपये होती. दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांना ११.२४ लाख कार्ड जारी करण्यात आले, ज्यांची मर्यादा १०,४५३.७१ कोटी रुपये होती. त्यापैकी ६५,००० किसान क्रेडिट कार्ड मच्छिमारांना देण्यात आले, ज्यांची मर्यादा ३४१.७० कोटी रुपये होती.

## शेतकऱ्यांना उन्हाळ हंगामात मिळणार राजमाचे प्रमाणित बियाणे

धाराशिव: 'महाबीज'कडून लातूर जिल्ह्यात ११, तर धाराशिव जिल्ह्यात तीन बीजोत्पादन कंपन्या आणि महाबीजकडून २५ हेक्टर क्षेत्रावर राजमा बीजोत्पादन कार्यक्रम राबविण्यात आला आहे. लातूर, जि. धाराशिव : दोन्ही जिल्ह्यांत मागील चार वर्षांपासून शेतकऱ्यांनी ज्वारी, हरभरा व सोयाबीनला पर्याय म्हणून राजमाला पसंती दिली आहे. यंदा तर अनेक शेतकऱ्यांनी उसामध्येही आंतरपीक म्हणून राजमालाच प्राधान्य दिले. या स्थितीत शेतकऱ्यांना राजमाचे अधिकृत बियाणे बाजारात मिळत नाही. सुटे व भेसळयुक्त बियाणे खरेदी करावे लागते. महाराष्ट्र राज्य बियाणे उत्पादक महामंडळाने (महाबीज) शेतकऱ्यांची ही अडचण लक्षात घेत येत्या हंगामात राजमाचे प्रमाणित बियाणे देण्याची तयारी सुरू केली आहे. यातूनच 'महाबीज'कडून लातूर जिल्ह्यात ११, तर धाराशिव जिल्ह्यात तीन बीजोत्पादन कंपन्या आणि महाबीजकडून २५ हेक्टर क्षेत्रावर बीजोत्पादन कार्यक्रम राबविण्यात आला आहे. यासोबत विभागीय संशोधन सल्लागार समितीकडेही प्रस्ताव पाठविण्यात आला आहे.

राजमा पिकाचे क्षेत्रात दोन्ही जिल्ह्यांत दरवर्षी वाढत होत आहे. सिंचनाची सोय उपलब्ध असलेले शेतकरी प्रामुख्याने रब्बीत ज्वारीला पर्याय म्हणून राजमाला प्राधान्य देत आहेत. कळंब व वाशी तालुक्यांत राजमाचे क्षेत्र चांगले वाढत आहे. एकट्या कळंब तालुक्यात चार हजारांहून अधिक हेक्टवरह राजमाची लागवड झाली आहे. यंदा तर अनेक शेतकऱ्यांनी उसातील आंतरपीक म्हणून राजमाला पसंती दिली आहे. राजमाचे खरेदीदारही मोठ्या संख्येने पुढे येत आहेत. कमी खर्चात व काढणीसाठी सोपे असलेले पीक म्हणून राजमाची ओळख शेतकऱ्यांत पुढे येत आहे. ७० ते ७५ दिवसांत उत्पादन होण्यासह राजमाला सात ते दहा हजार रुपये क्विंटल भाव मिळत आहे.




### जागतिक दिवस
### राष्ट्रीय युवा दिवस

### महत्वाच्या घटना

१७०५ : सातारा ही मराठा साम्राज्याची राजधानी करण्यात आली.
१७०८ : मराठा साम्राज्याचे पाचवेछत्रपती शाहू संभाजी भोसले महाराजांचाराज्याभिषेक केल्या गेल्या.
१९१५ : महिलांना मतदानाचा अधिकार देण्याचा प्रस्ताव अमेरिकन संसदेने फेटाळला.
१९३१ : सोलापूरचे क्रांतिवीर किसन सारडा, मल्लाप्पा धनशेट्टी व कुरबान हुसेन यांना फाशी
१९३१ : प्रसिद्ध पाकिस्तानी कवी अहमद फ़राज़ यांचा जन्म.
१९३६ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची धर्मांतराची त्रिवार घोषणा
१९३६ : जम्मू काश्मीर चे माजी मुख्यमंत्री मुफ्ती मोहम्मद सईद यांचा जन्म.
१९४९ : माजी संसद चे सदस्य पारसनाथ यादव यांचा जन्म.
१९६४ : राजनीतिज्ञ अजय माकन यांचा जन्म.
१९६४ : उत्तर प्रदेश चे माजी उपमुख्यमंत्री तसेच राजनीतिज्ञ दिनेश शर्मा यांचा जन्म.
१९७२ : काँग्रेस च्या खासदार प्रियंका गांधी वाड्रा यांचा जन्म.
१९८४ : स्वामी विवेकानंदयांच्या जन्मदिवसानिमित्त प्रत्येक वर्षी या दिवशी ''राष्ट्रीय युवा दिवस'' म्हणून साजरा करण्याची घोषणा करण्यात आली.
१९९७ : सामाजिक कार्यकर्त्या गंगुताई पटवर्धन यांना महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेतर्फे दिला जाणारा पहिला 'बाया कर्वे पुरस्कार' प्रदान
२००५ : राष्ट्रीय ज्ञान आयोगाची स्थापना
२००६ : हज यात्रेत झालेल्या चेंगराचेंगरीत ३६२ यात्रेकरुंचा मृत्यू
२००७ : ''रंग दे बसंती'' या चित्रपटाला ब्रिटिश ॲकेडमी फिल्म पुरस्कारासाठी निवडल्या गेले.
२००९ : जगप्रसिद्ध ए. आर. रेहमान हे गोल्डन ग्लोब अवार्ड मिळणारे पहिले भारतीय ठरले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१५९८ : राजमाता जिजाबाई (मृत्यू: १७ जून १६७४)
१८५४ : व्यंकटेश बापूजी केतकर विख्यात गणिती व आंतरराष्ट्रीय ख्यातीचे ज्योतिर्विद (मृत्यू: ३ ऑगस्ट १९३०)
१८६३ : स्वामी विवेकानंद भारतीय तत्त्वज्ञानाचा जगभर प्रसार करणारे तत्त्वज्ञ, रामकृष्ण परमहंस यांचे शिष्य, गुरुंची स्मृती चिरंतन राहावी यासाठी त्यांनी 'रामकृष्ण मिशन'ची स्थापना केली. (मृत्यू: ४ जुलै १९०२)
१८६९ : भारतरत्न पुरस्कारानेसन्मानित शास्त्री भगवान दास यांचा जन्म.
१८९३ : हर्मन गोअरिंग जर्मन नाझी (मृत्यू: १५ आक्टोबर १९४६)
१८९९ : पॉल हर्मन म्युलर डी. डी. टी. या पदार्थाचा अनेक कीटकांवर संपर्कजन्य विषारी परिणाम होतो या शोधाबद्दल नोबेल पारितोषिक (१९४८) मिळवणारे स्विस रसायनशास्त्रज्ञ (मृत्यू: १२ आक्टोबर १९६५ बेसल, स्वित्झर्लंड)
१९०२ : महर्षी न्यायरत्न धुंडिराजशास्त्री विनोद तत्त्वज्ञ, विचारवंत, योगी, स्वातंत्र्य सैनिक आणि लेखक (मृत्यू: १३ जुलै १९६९)
१९०६ : पं. महादेवशास्त्री जोशी साहित्यिक, भारतीय संस्कृतीकोषाचे व्यासंगी संपादक (मृत्यू: १२ डिसेंबर १९९२)
१९१७ : महर्षी महेश योगी (मृत्यू: ५ फेब्रुवारी २००८)
१९१८ : सी. रामचंद्र संगीतकार (मृत्यू: ५ जानेवारी १९८२)

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८९७ : सर आयझॅक पिटमॅन शॉर्टहँड या लघुलिपीचे जनक (जन्म: ४ जानेवारी १८१३)
१९२४ : भारतीय स्वातंत्र्य सैनिक गोपीनाथ साहा यांचे निधन.
१९३४ : भारतीय स्वातंत्र्य सैनिक सूर्य सेन यांचे निधन.
१९४४ : वासुदेव गणेश तथा वासुकाका जोशी लोकमान्य टिळकांचे निकटचे सहकारी, चित्रशाळेचे विश्वस्त (जन्म: २८ एप्रिल १८५४)
१९६६ : नरहर विष्णू तथा 'काकासाहेब' गाडगीळ स्वातंत्र्यसैनिक, लेखक, वक्ते, राजकीय नेते, केंद्रीय मंत्री आणि पंजाबचे राज्यपाल (जन्म: १० जानेवारी १८९६)
१९७६ : ॲगाथा ख्रिस्ती इंग्लिश रहस्यकथालेखिका, पहिल्या महायुद्धाच्या काळात त्या रेडक्रॉस इस्पितळात काम करत होत्या. त्यावेळेस त्यांनी 'मिस्टिरियस अफेअर्स अँड स्टाइल्स' ही पहिली रहस्यकथा लिहिली. ६८ कादंबऱ्या, १०० हून अधिक कथा, १७ नाटके अशी त्यांची साहित्यसंपदा आहे. त्यांचे साहित्य १०३ भाषांत अनुवादित झाले आहे. (जन्म: १५ सप्टेंबर १८९०)
१९९२ : शिवपुत्र सिद्धरामय्या कोमकलीमठ ऊर्फ ' कुमार गंधर्व' (जन्म: ८ एप्रिल १९२४)
१९९७ : ओ. पी. रल्हन हिन्दी चित्रपट निर्माते, दिग्दर्शक, लेखक व अभिनेते. 'तलाश', ' फूल और पत्थर', 'हलचल', 'पापी, 'शालिमार' हे त्यांचे काही गाजलेले चित्रपट आहेत.
२००५ : अमरीश पुरी आंतरराष्ट्रीय किर्ती प्राप्त केलेले चित्रपट व रंगमंच कलाकार (जन्म: २२ जून १९३२ लाहोर, पंजाब, पाकिस्तान)

# पशुसंवर्धन विभागाची पुनर्रचना क्रांतिकारक पाऊल

**राज्यातील शतकोत्तर रौप्यमहोत्सव साजरा करणारा हा विभाग येत्या २० मे २०२५ रोजी १३३ व्या वर्षात पदार्पण करत आहे. २० मे १८९२ रोजी स्थापन झालेला हा विभाग फक्त अश्व पैदास, पशुरोग नियंत्रण आणि पशुवैद्यकीय अध्यापन यापुरता स्थिमित होता. १८८३ मध्ये एका शासन नियुक्त समितीने सुचवल्याप्रमाणे परळ मुंबई येथे १८८६ मध्ये मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली. राज्यातील पशुपालकांना कृषी, अश्व व इतर पशु बाबत अध्यायवत माहिती होण्यासाठी पशुप्रदर्शन आयोजित करण्यास सुरुवात झाली. राज्यातील पहिले पशुप्रदर्शन सन १८८५ मध्ये अहमदनगर आत्ताच्या अहिल्यानगर येथे भरवण्यात आले होते. त्याचबरोबर पहिल्या पशुवैद्यकीय दवाखान्याची स्थापना देखील १ एप्रिल १८९२ रोजी नाशिक व धुळे येथे झाली. सुरुवातीला मुलकी पशुवैद्यकीय खाते म्हणून हा पशुसंवर्धन विभाग ओळखला जात होता.**

या विभागावर १९२४ मध्ये पशुरोग नियंत्रणाचे कार्य सोपवून १९३२ मध्ये अखिल भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या अनुदानातून पशुरोग अन्वेषणाचे काम मुंबई पशुवैद्यक महाविद्यालयात सुरू करण्यात आले. पुढे मग सुधारित पैदासीसाठी १९३१-३२ मध्ये वळू योजना, १९३६ मध्ये खडकी पुणे येथे कुक्कुट प्रकल्प असे करत करत १९५७ मध्ये कृषी खात्याशी संलग्न असणारा हा विभाग वेगळा करून पशुसंवर्धन तता पशुवैद्यकीय खाते म्हणून ओळखला जाऊ लागला. सुरुवातीला खाते प्रमुख म्हणून संचालक नंतर आयुक्त पशुसंवर्धन या विभागाचे कामकाज पाहू लागले. १९ जुलै १९४७ मध्ये पशुजैव पदार्थ निर्मिती संस्था औंध येथे स्थापन करण्यात आली. १९४८ पासून मुंबई प्राणी संरक्षण कायदा लागू करण्यात आला. १९५० पासून पुण्यात कृत्रिम रेतनाद्वारे पशु पैदास सुरू झाली. सुरुवातीला कृत्रिमरेतना साठी द्रवरूप वीर्य वापरण्यात येत होते. पुढे १९६८ पासून परदेशातून आयात केलेले गोठीत रेत वापरण्यास सुरुवात केली. पुणे येथे १९८० मध्ये डेन्मार्क देशाच्या मदतीने गोठीत रेत प्रयोगशाळा उभारली. पुढे मग १९८५ मध्ये नागपूर आणि १९९२ मध्ये औरंगाबाद येथे गोठीत रेतमात्रा प्रयोगशाळा स्थापन करण्यात आल्या. १ मे १९६० मध्ये महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. लोकशाहीचे विकेंद्रीकरण १ मे १९६२ रोजी झाल्यानंतर जिल्हा परिषद, पंचायत समितीची निर्मिती करण्यात आली. त्याचवेळी पशुसंवर्धन खात्याच्या अखत्यारीतील २० योजना जिल्हा परिषद कडे हस्तंतरित करण्यात आल्या. त्यानंतरचा विभागाचा प्रवास सर्वांना ज्ञात आहेच. राज्यातील अनेक अल्प व अत्यल्प भूधारक पशुपालक, भटके विमुक्त पशुपालकांच्या अथक परिश्रमातून हा विभाग वाटचाल करत आहे. त्यासाठी अनेक संस्था, दूध संघ, विद्यापीठे प्रयोगशाळा, राजकीय पदाधिकारी, नोकरशहा यांच्यासह पशुसंवर्धन विभागातील अधिकारी कर्मचारी यांचे योगदान आहे यात शंका नाही.

अलीकडे पशुसंवर्धन विभागाची पुनर्रचना करण्यात आली आहे. ती समजून घेण्यासाठी हा इतिहास माहीत माहित असणे जरुरी आहे. विभागाने अनेक चढउतार पाहिले आहेत. अनेक सचिव महोदयांनी या विभागाचा आढावा घेऊन प्रशासकीय सोयीसाठी, आर्थिक बचत करण्यासाठी अनेक वेळा तात्कालीक परिस्थितीत पुनर्रचनेसारखे निर्णय घेतले आहेत. उदाहरण द्यायचे झाले तर विभागात पूर्वी अंडी संकलन व वितरण, वराह पालन प्रोत्सानासाठी काही योजना होत्या. त्या दृश्य परिणाम दिसण्याआधीच बंद केल्या. बंद करत असताना पशुपालकांचा विचार झाला असेल असे वाटत नाही. आज देशात एकूणच पशुसंवर्धन चे महत्व वाढत आहे.



मानवाच्या आहारात दूध अंडी मांस यांच समावेश वाढत आहे. व्यवसाय वृद्धी, रोजगार वृद्धी व प्राणीजन्य उत्पादनाची निर्यात यातून मजबूत होणारी अर्थव्यवस्था सर्वांसमोर आहे. महाराष्ट्र राज्य प्रगतिशील असून राज्याच्या उत्पन्नात पशुसंवर्धनचा वाटा २.४% आहे. कृषी क्षेत्रात २४ % वाटा हा निव्वळ पशुसंवर्धनचा आहे. मा. पंतप्रधानांनी पाच ट्रिलियन अर्थव्यवस्थेचा लक्षांक निश्चित केला आहे. तो गाठायचा असेल तर पशुसंवर्धन कडे विशेष लक्ष द्यावे लागेल हे सर्वांनी आज मान्य केले आहे. त्यासाठी १० नोव्हेंबर २०२४ रोजी पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विभागाची पुनर्रचना करण्याबाबत शासन निर्णय जारी करण्यात आला. जागतिक तापमान वाढ, पशुधनाची घटती उत्पादन क्षमता, वाढत चाललेले वंध्यत्व सोबत प्राणिजन्य आजारांचा उद्रेक या सर्वांचा विचार करून राज्यातील पशुपालकांना तज्ञ पशुवैद्यकीय सेवा मिळाली पाहिजे. वाढत चाललेला प्रतिजैव प्रतिरोध त्यातून मानवी आरोग्याला निर्माण झालेला धोका कमी करण्यासाठी या पुनर्रचनेत राज्यातील सर्व पशुवैद्यकीय दवाखान्यात पशुवैद्यकीय पदवीधर नेमण्यात येणार आहेत. हा निर्णय यापूर्वीच भारतीय पशुवैद्यक परिषद अधिनियम १९८४ हा कायदा पास करून केंद्रात घेण्यात आला आहे. महाराष्ट्रात देखील हा कायदा लागू केला आहे. तथापि राज्यातील पदवीधर पशुवैद्यकांची कमी असलेली संख्या, राजकीय इच्छाशक्ती अशा कारणामुळे याची अंमलबजावणी रखडली होती. पण आज जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत आयात निर्यात धोरण ठरवताना त्या देशातील त्या राज्यातील एकूणच पशुवैद्यकीय सेवेचा दर्जा तपासला जातो. केंद्राच्या पाच ट्रिलियन अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आणि एकूणच राज्यातील पशुपालकांचा पशुसंवर्धन कडे वाढत चाललेला कल ओळखून ही पुनर्रचना करण्यात आली

**डॉ. व्यंकटराव घोरपडे**
सेवानिवृत्त सहाय्यक आयुक्त
पशुसंवर्धन, सांगली.

आहे. गाव पातळीवर पशु आरोग्य, पशुखाद्य, चारा उत्पादन, पशु प्रजनन व व्यवस्थापन यामध्ये अमुलाग्र बदल अपेक्षित आहेत. अनेक प्राणीजन्य आजारावर नियंत्रण मिळवायचे आहे. वन हेल्थ प्रोग्रॅम साठी शासन आग्रही आहे. तज्ञ पशुवैद्यकीय सेवा पशुपालकांच्या मिळाल्यामुळे त्यांचे आर्थिक नुकसान देखील टाळता येईल. पशुखाद्य व वैरण याचा दर्जा सुधारेल. त्यातून पशु प्रजनन पशुधनाची उत्पादनक्षमता सुधारणे अपेक्षित आहे. आपले राज्य हे दूध अंडी आणि मांस याच्या उत्पादनामध्ये खूप मागे आहे. दरडोई सेवनात देखील वाढ अपेक्षित आहे. आज दररोज दरडोई ३१५ मिली दूध राज्यात उपलब्ध आहे. देशपातळीवर तेच ४२९ मिली दूध उपलब्ध आहे. हीच बाब अंडी आणि मांस याबाबतीत देखील आहे. त्यामध्ये देखील सुधारणा होईल. आता अनेक तरुण सुशिक्षित पशुपालकाचा ओढा हा पशु उद्योजकते कडे वळायला लागलेला आहे. त्यांना योग्य मार्गदर्शनाची आवश्यकता होती ती या माध्यमातून पूर्ण होऊ शकते. असा एकूणच क्रांतिकारी निर्णय या पुनर्रचनेच्या माध्यमातून घेण्यात आला आहे.

इतका मोठा क्रांतिकारक निर्णय घेताना त्यामध्ये निश्चितपणे काही त्रुटी असण्याची शक्यता नाकारता येत नाही. किंबहुना विभागातील अनेक अधिकाऱ्यांचे तसे म्हणणे देखील आहे. अनेक संस्थांमधून सहाय्यक पदे न ठेवता ती कमी केली आहेत. त्यामुळे सदर संस्थांच्या कामकाजावर मोठा परिणाम होऊ शकतो असे त्यांचे मत आहे. अनेक ठिकाणी सरकारी वाहनांची सोय केली नाही. प्रशासकीय नियंत्रण, योजनांचे सनियंत्रण हे परिणामकारक होण्यासाठी वरिष्ठ लिपिक, कनिष्ठ लिपिक यांची पदे देखील भरावी लागणार आहेत. या पुनर्रचनेत विविध संवर्गाना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नाहीत अशी ही कुजबुज विभागातील अधिकाऱ्यांच्या मध्ये आहे. राज्यस्तरीय प्रशिक्षण केंद्र गोखलेनगर या संस्थेत अलीकडे मोठ्या प्रमाणात आधुनिकीकरण व पायाभूत सुविधा वाढवण्यात आल्या आहेत. राज्यातील सर्व संबंधित अधिकारी, पशुपालक, योजनेचे लाभार्थी, सेवादाते, पशु सखी व पशु मित्र यांचे प्रशिक्षण या ठिकाणी घेण्यात येणार आहे. अशा ठिकाणची देखील काही पदे कमी केली आहेत. त्यामुळे एकूणच संस्थेच्या दैनंदिन कामकाजावर त्याचा परिणाम होऊ शकतो. कमी करण्यात आलेली सहाय्यक आयुक्तांची पदे त्यासाठी पुर्ववत ठेवणे अपेक्षित आहे. अलीकडे पशुखाद्य गुणवत्तेबाबत काही निर्णय राज्य सरकारने घेतले आहेत. त्यासाठी विभागाची पशुखाद्य गुण नियंत्रण प्रयोगशाळा गोखलेनगर येथे आहे. त्या ठिकाणी देखील पूर्वीप्रमाणे पदे ठेवणे अपेक्षित आहे. असाच प्रकार जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त कार्यालय, रोग अन्वेषण प्रयोगशाळा, जैव पदार्थ निर्मिती संस्था या ठिकाणी सहाय्यक आयुक्त दर्जाची पदे जी घालवली आहेत ती देखील पूर्ववत ठेवणे अपेक्षित आहे. जेणेकरून त्यां संस्थांचे दैनंदिन कामकाज हे बाधित होणार नाही. त्यामुळे सर्व बाबी देखील तितक्याच महत्त्वाच्या आहेत यात शंका नाही. सदर पुनर्रचनेमध्ये जिल्ह्यातील सर्व पशुवैद्यकीय संस्थांचे सनियंत्रण हे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे जाणार आहे. त्यामुळे पूर्वी जिल्ह्यात असलेल्या राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय पशुवैद्यकीय दवाखान्यांचे वेगवेगळे नामकरण न करता सर्वच दवाखान्यांना पशुवैद्यकीय दवाखाने संबोधने योग्य राहील. जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र हे देखील स्वतंत्रपणे सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन यांच्या नियंत्रणाखाली आणण्यात आल्याचे कळते तथापि याबाबत देखील स्पष्ट उल्लेख शासन निर्णयात होणे अपेक्षित आहे. सर्व दवाखाने व आस्थापना जिल्हा परिषद स्तरावर हस्तांतरित होत असल्यामुळे विभागीय पद म्हणून प्रादेशिक पशुसंवर्धन सह आयुक्त या पदाचे असणारे अधिकार व जबाबदारी ही देखील निश्चित होणे आवश्यक आहे. सद्यस्थीतीत राज्यात १६९ तालुका लघु पशु सर्व चिकित्सालये कार्यरत आहेत. या संस्था तालुकास्तरावर रोगनियंत्रण तसेच अत्याधुनिक उपचार पुरविणाऱ्या संदर्भ संस्था म्हणुन कामकाज पाहत आहेत.या संस्थेमार्फत संपूर्ण तालुक्याचे तांत्रिक सनियंत्रण, रोगनियंत्रण, कत्तलखान्यांवर सनियंत्रण,जनावर वाहतुक प्रमाणपत्र देणे, शव विच्छेदन, व्हेटीरोलिगल केसेस, अत्यधुनिक यंत्रांचा वापर करून,रोग निदान करणे, किचकट शस्त्रक्रिया करणे इत्यादी कामे केली जातात.या साठी सध्या या संस्थेकडे सहाय्यक आयुक्त यांचे सोबत पशुधन विकास अधिकारी हे पद कार्यरत आहे. परंतु नविन पुर्नरचनेनुसार सदर ठिकाणी एक सहाय्यक आयुक्त, एक सहाय्यक पशुधन विकास अधिकारी व एक प्रयोगशाळा तंत्रज्ञ व एक बहुउद्देशीय कर्मचारी अशी एकूण फक्त चार पदे मंजुर करणेत आली आहेत. संस्थेकडील तांत्रिक कामाचा व्याप पहाता नवीन पुनर्रचनेत एक पशुधन विकास अधिकारी गट-अ व दोन बहुउद्देशीय कर्मचारी हि पदे मंजूर केल्यास संस्थेचे सर्व तांत्रिक कामकाज सुरळीत होण्यास मदत होईल व तालुकास्तरावरून प्रभावी तांत्रिक सेवा उपलब्ध करून देता येईल.

या सर्व त्रुटी, अपेक्षा, मागण्या असल्या तरीदेखील खूप वर्षानंतर या भारतीय पशुवैद्यक परिषद अधिनियम १९८४ कायद्याची अंमलबजावणी होत आहे. या कायद्याची अंमलबजावणी करता करता राज्यातील एक पदवीधरांची पिढी सेवानिवृत्त देखील झालेली आहे. विभागात सध्या कार्यरत असलेल्या सर्व संघटनांनी पशुपालकांचे हित डोळ्यासमोर ठेवून हा निर्णय घेताना जो समंजसपणा दाखवला आहे तो निश्चितच कौतुकास्पद आहे. वैयक्तिक कोणतेही हेवेदावे न ठेवता फक्त पशुपालकांचे हित आणि राज्याची प्रगती डोळ्यासमोर ठेवून प्रशासनास सहमती दर्शवलेली आहे. येणाऱ्या काळामध्ये या क्रांतिकारक निर्णयाचे दृश्य परिणाम राज्यामध्ये दिसण्यासाठी या सर्व बाबींचा यथावकाश विचार हा निश्चित केला गेला पाहिजे. तथापि या सर्व त्रुटी किंवा असणाऱ्या मागण्या, अपेक्षा पूर्ण होईपर्यंत सध्या कार्यरत असणाऱ्या सर्व अधिकाऱ्यांच्या आणि कर्मचाऱ्यांच्या कसोटीचा काळ हा राहणार आहे. प्रत्येकाने नेमून दिलेल्या कामाव्यतिरिक्त जादाचे काम करून विभागाची घोडदौड ही चालू ठेवावी लागणार आहे. अनेक वेळा राज्यामध्ये वेगवेगळ्या रोगांचा प्रादुर्भाव झाल्यानंतर विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी एकजूट राखून त्याचा मुकाबला केला आहे. याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे मागील दोन वर्षांमध्ये लंपी स्कीन रोगाच्या साथीत दाखवून दिले आहे. जर याबाबतीत कोणत्याही कारणाने अधिकारी, कर्मचाऱ्यांचे दुर्लक्ष झाले आणि राज्य शासनाने देखील यातील त्रुटी बाबत सकारात्मक विचार करण्यास वेळ लावला तर मात्र तर ज्या कारणासाठी ही पुनर्रचना केली आहे ती कारणे साध्य करण्यासाठी आपल्याला खूप वेळ लागू शकतो जे विभागाच्या आणि राज्याच्या हिताचे नाही हे मात्र निश्चित.

cmyk

# शहरातील रखडलेल्या रस्ते ; धुर ,धुळीने बीडकरांचा श्वास गुदमरला

## स्थानिक लोकप्रतिनिधींनींच्या उदासीनतेमुळे थेट केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितिन गडकरींनाच साकडे







बीड

बीड शहरातुन जाणारे दोन राष्ट्रीय महामार्गाचे काम रखडलेल्या अवस्थेत असुन संथगतीने होणा-या कामांमुळे धुर आणि धुळीमुळे बीडकरांचा श्वास गुदमरला असुन स्थानिक लोकप्रतिनिधींनींकडुन होणारे दुर्लक्ष यामुळे सामाजिक कार्यकर्त्यांनी थेट केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितिनजी गडकरी यांनाच साकडे घातले असुन सोमवारी दि.१३ रोजी छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ नितिन गडकरी यांच्या प्रतिमेची महाआरती करून बीड शहरातील रखडलेल्या अवस्थेत असणारे अर्धवट काम केलेले बीड ते अहिल्यानगर आणि धुळे ते सोलापूर राष्ट्रीय महामार्गाचे काम तातडीने पूर्ण करण्यात यावेत . बीड ते अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५६१ रस्त्याचे काम बीड शहर ते नवगणराजुरी दरम्यान ठेकेदार व बांधकाम विभागाच्या नियोजनाअभावी वर्षभरापासून रखडलेले असुन त्यामुळे नागरिकांना ,वाहनचालकांना धुळ, खड्डे,कचखडी यांचा त्रास सहन करावा लागत आहे.तसेच बीड शहरातील १८ कोटी रुपये किंमतीचे राष्ट्रवादी भवन ते काकु नाना हास्पिटल सिमेंट रस्ता काम अडीच वर्षांपूर्वी होऊनही साइडपंखे भरलेले नाहीत.दुभाजकांचे काम पूर्ण केले नाही त्यामुळे शहरातील रस्त्यांवरुन जाताना येताना वाहने घसरुन अपघात होत आहेत. तसेच बीड जिल्ह्यातील खामगाव ते पंढरपूर राष्ट्रीय महामार्गावरील माजलगाव ते केज दरम्यान तसेच अहमदपूर ते अहिल्यानगर मार्गावरील अंबेजोगाई ते मांजरसुंभा दरम्यान आणि पैठण ते पंढरपूर महामार्गावरील पाटोदा आणि शिरूर कासार याठिकाणी रस्त्यांचे काम निकृष्ट दर्जाचे व अर्धवट रखडलेल्या अवस्थेत असुन तातडीने पूर्ण करण्यात यावेत अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे,शेख युनुस, सुदाम तांदळे,रामनाथ खोड, शिवशर्मा शेलार,यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितिनजी गडकरी यांना जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

बीड ते अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५६१ मार्गावरील शिरापुर फाटा ते बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा आणि बार्शी नाका ते जरूड फाटा असा १६० कोटी रूपयांचे अंदाजपत्रक असलेल्या २४.५ किलोमीटरचा ९४ फुट रूंद असलेल्या रस्त्याचे काम ३० जुन २०२३ रोजी सुरू करण्यात आले. बीड शहरातील नगर रोडवर महत्वाची सर्वच शासकीय कार्यालये आहेत.यामध्ये जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा न्यायालय, सामाजिक न्याय भवन, शासकीय विश्रामगृह, तहसिल पंचायत समिती, सार्वजनिक बांधकाम विभाग,यासह महाविद्यालय,हास्पिटल असुन शहराच्या दृष्टीने महत्वाचा रोड आहे.गेल्या दिड वर्षात केवळ दिड किलोमीटरचे काम करण्यात आलेले आहे. रस्त्याचे काम अत्यंतसंथ गतीने सुरू असुन रेंगाळलेल्या कामामुळे रस्त्याने जाणाऱ्यांना प्रचंड धुळीचा सामना करावा लागत असुन नागरीकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे तातडीने काम पूर्ण करण्यात यावे. बीड शहरातील १८ कोटी रुपये किंमतीच्या राष्ट्रवादी भवन ते काकु नाना हास्पिटल सिमेंट रस्ताकाम अडीच वर्षांपूर्वी पुर्ण झाले आहे.मात्र रस्त्यावरील साईडपंखे भरलेले नाहीत.तसेच दुभाजकांचे कामही पूर्ण केलेले नाही.त्यामुळे शहरातील रस्त्यांवरुन सिमेंट रस्त्यावर जाताना व येताना वाहने घसरुन अपघाताचे प्रमाण वाढले आहे. अडीच वर्षांपूर्वी भारतीय राज्य महामार्ग प्राधिकरण एनएचएआय वतीने शहरातील राष्ट्रवादी भवन ते काकु नाना हास्पिटल दरम्यानचा १.२५ किलोमीटर रस्त्याचे काम करण्यात आले. त्यानंतर तो रस्ता देखभालीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करण्यात आला आहे.मात्र बांधकाम विभागाने डागडुजी केली नाही.साईडपंखे रस्ता तयार करणारांनी भरून काढणे गरजेचे असल्याचे बांधकाम विभागाचे अधिकारी सांगतात त्यामुळे काम रखडलेलेच आहे.ते पुर्ण करण्यात यावेत. बीड शहरातील रखडलेले रस्ते कामामुळे जागोजागी धुळीचे साम्राज्य पसरले असुन धुळीमुळे श्वसनाचे आजार जडतात. यामुळे दम लागणे, खोकला येणे, श्वासोच्छवासास त्रास होणे तसेच श्वसन मार्गाला संसर्ग होऊन ईतर आजारही उद्भवतात त्यामुळे बीडकरांचे आरोग्य धोक्यात आले आले. बीड जिल्ह्यातील खामगाव ते पंढरपूर महामार्गावरील माजलगाव ते तेलगाव तसेच अहमदपूर ते अहिल्यानगर मार्गावरील लोखंडी सावरगाव ते मांजरसुंभा आणि पैठण ते पंढरपूर राष्ट्रीय महामार्गावरील पाटोदा शहर आणि शिरूर कासार घाट आदी ठिकाणी निकृष्ट दर्जाचे व रखडलेल्या अवस्थेत कामे असुन तातडीने पूर्ण करण्यात यावेत.

### जिल्ह्यात अपघातात बळी जाणारांची संख्या वाढली

बीड जिल्ह्यात सन २०२२ साली ७३४ अपघात झाले.यामध्ये ३९४ भीषण अपघात होते.यामध्ये जवळपास ४६२ जणांचा मृत्यू झाला.तर २७० गंभीर अपघातात ४६१ जणांना कायमचे अपंगत्व आले.तर किरकोळ अपघातात ५८ जण जखमी झाले होते तसेच सन २०२३ साली जवळपास ८०३ अपघात झाले.यामध्ये ४५० जणांचा मृत्यू झाला.यामध्ये ४०१ पुरुष तर ४९ महिलांचा समावेश होता.तर ५३३ जणांना कायमचे अपंगत्व आले आहे तर ४४ जणांना गंभीर स्वरूपाचा मार लागला होता.सन २०२४ साली १ जानेवारी ते ३१ आगस्ट २०२४ या ८ महिन्यात २७३ अपघात झाले. या ८ महिन्यात राष्ट्रीय महामार्गावर ५२ तर राज्य मार्गावर १२९ व ईतर रस्त्यावर ९२ अशा एकुण २७३ अपघातात २६३ पुरुष व ३१ महिलांचा मृत्यू झाला आहे.याच कालावधीत जिल्ह्यात २३० अपघात असे घडले की त्यात २९२ जण गंभीर रित्या जखमी यात ३२२ पुरुष व ७० महिलांचा समावेश आहे.

# पिंपळवंडी येथील सांस्कृतिक सभागृह बनले टाकाऊ वस्तूचे माहेरघर

पिंपळवंडी । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथे माजी केंद्रीय मंत्री जयसिंगराव गायकवाड पाटील यांनी खासदार फंडातून लाखो रुपये खर्चाचे येथील मारुती मंदिराशेजारी सांस्कृतिक सभागृह उभारलेले आहे.या सांस्कृतिक सभागृहाचा वापर समाज उपयोगी सार्वजनिक कार्यक्रमासाठी व्हावा हा उद्देश होता.परंतु,या भव्य वास्तूची खूपच दयनीय अवस्था झाल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. या वास्तूची फरशी जागोजागी तुटल्याने या वास्तूला घुशी लागल्याने उकीर काढून वाळू मातीचे गुडघ्याच्या उंचीचे ढीगोर दिसत आहेत.तर या ठिकाणी शाळेतील निरोपयोगी बेंच- डेस्क मोठ्या प्रमाणात टाकलेले असून शाळेतील जुने पुस्तके सुद्धा याच ठिकाणी दिसत आहेत.या सांस्कृतिक सभागृहात अनेक वेळा सार्वजनिक कार्यक्रमाबरोबर गणेश उत्सवात गणपती मंडळामार्फत गणपती बसवणे




तसेच नवरात्र उत्सवात देवीची स्थापना करून दैनंदिन उत्सव साजरी केले जात होते.परंतू,मागील काही वर्षापासून या सांस्कृतिक सभागृहाकडे दुर्लक्ष झाल्याने या भव्य वास्तूला उकिरड्याचे स्वरूप आले असून सभागृहाची चोहोबाजूने दुर्दशा झालेली आहे.यावर कोणाचेच नियंत्रण नसल्याने या सभागृहाचे गेट सतत उघडे असल्याने हे भटकत्या कुत्रे-मांजराचे आश्रयस्थान बनले आहे.या वास्तूची सबंधित विभागाने डागडुजी करून व योग्य दुरुस्ती केली तर ही लाखमोलाची वास्तू समाजउपयोगी येईल अशी ग्रामस्थात चर्चा केली जात आहे.येथील अंगणवाडी (क्र.१) खोलीअभावी ग्रामपंचायतच्या एका रूममध्ये भरवली जात आहे.सांस्कृतिक सभागृहाची डागडुजी व दुरुस्ती झाली तर या सभागृहाचा अंगणवाडी शाळा भरवण्यासाठी उपयोग होऊन अंगणवाडीचीही समस्या मार्गी लागेल. याकरिता संबंधित विभागाने त्वरित दखल घेऊन सांस्कृतिक सभागृहाला पुन्हा गतवैभव प्राप्त करून देऊन सांस्कृतिक सभागृहाच्या माध्यमातून समाज उपयोगी उपक्रम राबविण्यास वास्तु सज्ज असावी अशी ग्रामस्थांची अपेक्षा आहे.

# स्वामी अमृत भारती विद्यालयाचा १००% टक्के निकाल

पिंपळवंडी । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील श्री.गंगा भारती शिक्षण प्रसारक मंडळ संचलित,श्री स्वामी अमृत भारती विद्यालयाने इंटरमिजिएट चित्रकला स्पर्धेत घवघवीत यश संपादन केले आहे.या स्पर्धेचा नुकताच निकाल लागला असून सर्व विद्यार्थी उत्तीर्ण होऊन १००% टक्के निकाल लागला आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे.

यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये (ग्रेड-बी) मध्ये अतिश विरभद्र दहिफळे, कु.दिक्षा कुंडलिक मोरे,कु.दिपाली दत्तात्रय जाधव,शिवम शांतीलाल गाडे,शिवानंद प्रशांत राऊत,कु.श्रावणी शरद सारगुडे,कु.सृष्टी बापूराव बांडराव तसेच (ग्रेड -सी) मधून कुमारी अदिती आप्पाराव सुळ,कु.दिपाली महादेव खरमाटे,कु.नेत्रालय अमोल लाड, कु.पूजा निलेश पवार,कु.प्रतीक्षा सोमनाथ मोरे,कु.प्रमिला पोपट पवार, सार्थक सुरेश पवार,कु.शितल राजेंद्र पवार,शिवम विठ्ठल पवार,सिद्धार्थ ज्ञानेश्वर जाधव,कु.वैष्णवी सयाजी पवार,विवेक महादेव धनवडे यांचा समावेश आहे.सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष तथा महंत ह.भ.प. महादेवानंद भारती महाराज, सहसचिव प्रताप पवार सर, मुख्याध्यापक ए.एम.पवार सर कलाशिक्षक बांडराव सर व विद्यालयाचे सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.

# उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या वतीने रक्तदान शिबिर व विविध कार्यक्रमाचे आयोजन

अंबाजोगाई। प्रतिनिधी

उप प्रादेशिक परिवहन कार्यालय अंबाजोगाई तर्फे दरवर्षीप्रमाणे यावर्षीही रस्ता सुरक्षा अभियान २०२५ राबविण्यात येत आहे दिनांक १ जानेवारी ते ३१ जानेवारी दरम्यान होणाऱ्या विविध कार्यक्रम आयोजित केले आहे आज दिनांक १० जानेवारी रोजी उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या वतीने रक्तदान शिबिर घेण्यात आले यावेळी सर्व कर्मचारी सहकारी त्यांनी रक्तदान करून सहकार्य केले यावेळी पुढील कार्यक्रमाची रूपरेषा कशी असेल आभियानात अंबाजोगाई उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या वतीने शाळा आणि महाविद्यालयात वाहतूक नियमांची आणि चिन्हांची माहिती देणारी व्याख्याने आयोजित करणे, घोषवाक्य स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, नियमांचे पालन न करणाऱ्या वाहन चालकांना गुलाब पुष्प देणे आणि त्यांना नियम पाळण्यास प्रवृत्त करणे, नियम पाळणाऱ्यांचे पुष्पगुच्छ द देऊन अभिनंदन करणे, मोटार सायकल रॅली, शालेय विद्यार्थ्यांची



वॉकेथोन, रस्ता सुरक्षा याबाबत बैनर्स प्रदर्शित करणे, वाहन चालकांसाठी आरोग्य शिबीर आणि नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन, करणे, कार्यक्षेत्रातील साखर कारखान्यांवर ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर्स ट्रेलर्स, ट्रक, बैलगाडी इत्याना लाल रंगाचे फ्लेक्टिव्ह टेप आणि लाल रंगाचे रिफ्लेक्टिव्ह ध्वज लावणे, ऊस वाहनचालकांचे रस्तसुरक्षा प्रबोधन करणे, स्तसुरक्षा विषयक शपथ / प्रतिज्ञ देगे, नो हॉर्न, नो किंवा मुद्द्यावर प्रबोधन करणे, वाहन चालवितांना मोबाईलचा वापर न करणे, सीट बेल्टचा वापर करणे, हेल्मेटचा वापर योग्य प्रकारे करणे या मुद्द्यांवर वायुवेग पथकामार्फत कार्यक्षेत्रात वाहन तपासणी मोहीम राबविणे, इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे.वा आमच्या मोहिमेमुळे आपण कांही जीव वाचवू शकतो प्रादेशिक परिवहन कार्यालय अंबाजोगाई मार्गदर्शक :श्री विनोद चव्हाण, आरटीओ, श्री हर्षल डाके डीपोटी आरटीओ शेखर आचार्य, विनोद उंबरजे, (सहा. मो.नि)श्रीमती साधना दूधमुळे कोमल मोरे, ऐश्वर्या कराड, शिवशंकर धोंडे ज्ञानेश्वर कांबळे प्रवीण हरदे अमोल निलेश पवार सागर करंडे अफरोश सिद्दिकी अशोक बोलचेटवार तसेच कर्मचारी उपपरादेशिक परिवहन कार्यालयाचे कर्मचारी आदी उपस्थित होते.


## नगरपंचायत कार्यालय, तीर्थपुरी

प्रशासकीय इमारत, तीर्थपुरी

Email : nptirthpuri2021@gmail.com

जा.क्र/नपमं/स्वच्छता. वि / /२०२५ दिनांकः ०१.२०२५

### जाहीर आवाहन

संदर्भ :- नगरविकास शासन निर्णय क्रमांक याचिका ३०१७ प्र.क्र १३०/नवि-२२ दिनांक. १४. नोव्हेंबर २०२२ तीर्थपुरी नगरपंचायत क्षेत्रामध्ये होर्डिंग फ्लेक्स, बॅनर्स, पोस्टर्स इत्यादी बाबत SOP (Standard operating Procedure) खालील प्रमाणे

| अ.क्र | होर्डिंग फ्लेक्स, बॅनर्स, पोस्टर्स लावण्यासाठी निश्चित केकेल्या जागा | |
|---|---|---|
| ०१ | आण्णाभाऊ साठे चौक घनसावंगी रोड तीर्थपुरी | |
| ०२ | नवीन बसस्थानक तीर्थपुरी | |
| ०३ | नगरपंचायत कॉम्प्लेक्स बालाजी मेडीकल परिसर तीर्थपुरी | |
| ०४ | अंबड रोड कॅनॉल परिसर तीर्थपुरी | |
| ०५ | शासकीय दर | २ रु प्रती Sq Feet प्रति दिन |
| ०६ | परवानगीसाठी अर्ज करण्यासाठी Website | https://mahaulb.in./MahaUlB/index |
| ०७ | अनधिकृत बॅनर्स तक्रारीसाठी टोल फ्री क्रमांक/मेल आय डी | nptirthpuri2021@gmail.com |
| ०८ | Strucatural Audit Report | सर्व शासकीय व सामाजिक तसेच वयक्तिक संस्थानी आपल्या परिसरातील होर्डिंग फ्लेक्स, बॅनर्स, पोस्टर्स लावण्यासाठी उभारलेल्या मोठ्या लोखंडी फ्रेम (stracture) याचे दरवर्षी ३१ मार्च पर्यंत Strucatural Audit करून Strucatural Audit Report या कार्यालयास सादर करणे अनिवार्य आहे. |
| ०९ | नोडल ऑफिसरचे नाव | व्ही. व्ही. सोनखेड़कर ८६६९०१५६१४ |
| १० | वार्ड अधिकारी | बजरंग घुलेकर ९९२२२६३७९५ |
| ११ | तीर्थपुरी नगर पंचायत वार्ड कामकाज समिती | १) व्ही. व्ही. सोनखेडकर ८६६९०१५६१४ (नोडल ऑफिसर)<br>२) बजरंग घुलेकर ९९२२२६३७९५ (वार्ड अधिकारी)<br>३) जितेंद्र गाडेकर ९२२६८३७७७० (सदस्य)<br>४) सोपान कडुकर ९४२३८४४८८२ (सदस्य)<br>५) संतोष लवनाडे-९४०३१५३००७ (सदस्य) |

वरील ठिकाणी नगरपंचायतचे परवानगी घेऊनच होर्डिंग, फ्लेक्स, बॅनर्स व पोस्टर्स लावण्यात यावे. जर उपरोक्त जाहीर केलेल्या ठिकाणा व्यतिरिक्त इतर ठिकाणी विना-परवानगी होर्डिंग, फ्लेक्स, बॅनर्स व पोस्टर्स लावल्यास संबंधिता विरुध्द मा. उच्च न्यायालयातील जनहित याचिका क्र १५५/२०११ च्या आदेशान्वये फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

स्वाक्षरित

**मुख्याधिकारी**

नगर पंचायत धर्मापुरी


# पतंजलि योग समितीकडून १५० शिबिरांचे आयोजन

## ६५ हजार विद्यार्थ्यांना माजी सैनिक दत्ता लांब यांनी मोफत योग शिकवला

अंबाजोगाई। प्रतिनिधी

येथील जीवन शिक्षण प्राथमिक विद्यालय आणि पतंजलि योग समिती, अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार, दिनांक १० जानेवारी रोजी १५० वे नि:शुल्क योग विज्ञान शिबिर आयोजित करण्यात आले होते.

शहर व तालुक्यातील विविध शाळा तसेच महाविद्यालयांतून योग दिंडी आपल्या दारी या अभियानांतर्गत १५० योग विज्ञान शिबिरांतून तब्बल ६५ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना मागील एक वर्षापासून योगाचे मोफत धडे देण्याचे काम पतंजलि योग समितीचे मुख्य योग प्रशिक्षक माजी सैनिक आयुर्वेदिक चिकित्सक दत्ता सदाशिव लांब हे करीत आहेत. त्यांच्या १५० व्या योग विज्ञान शिबिराच्या सांगता समारोहाचे आयोजन शुक्रवार, दिनांक १० जानेवारी रोजी येथील जीवन शिक्षण प्राथमिक विद्यालय येथे आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ब्रह्मकुमारी मंजुषा दीदी (प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय, अंबाजोगाई.) या होत्या तर यावेळी प्रमुख अतिथी म्हणून इंजि.परमेश्वर भिसे (योग साधना परिवार,अंबाजोगाई.), नितेश शिराळे (मुख्याध्यापक, जिल्हा परिषद शाळा), सौ.स्वप्नाली शिराळे (चेअरमन, पिताजी सारडा नगरी,अंबाजोगाई.), ऍड.जयसिंग चव्हाण (अध्यक्ष, जीवन शिक्षण प्राथमिक विद्यालय,अंबाजोगाई.), अजित माने (सचिव, जीवन शिक्षण प्राथमिक विद्यालय,अंबाजोगाई.), धनंजय इंगळे (प्रभारी, पतंजलि योग समिती,अंबाजोगाई.), मुख्य योग प्रशिक्षक दत्ता लांब व आयोजक सौ.अंजली लोहिया (मुख्याध्यापिका,जीवन शिक्षण प्राथमिक विद्यालय,अंबाजोगाई.) या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरूवात दीपप्रज्वलन, सरस्वती पूजन आणि विश्वशांती प्रार्थनेने झाली. यानंतर



मान्यवरांचे यथोचित स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमात पतंजलि योग समितीकडून योग शिबिराचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल सन्मानचिन्ह देऊन जीवन शिक्षण प्राथमिक विद्यालयाचा मान्यवरांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी बोलताना ब्रह्मकुमारी मंजुषा दीदी यांच्यासह उपस्थित मान्यवरांनी माजी सैनिक दत्ता लांब (योग शिक्षक व प्राकृतिक चिकित्सक) यांचा सत्कार केला. या प्रसंगी ब्रह्मकुमारी मंजुषा दीदी यांनी योग व ध्यनाचे महत्व समजावून सांगितले आणि पुढील उज्ज्वल भविष्यासाठी शुभाशिर्वाद दिले, तर धनंजय इंगळे (प्रभारी, पतंजलि योग समिती, अंबाजोगाई) यांनी योग प्रोटोकॉल शिकवला, योगाचे महत्व विशद केले. तसेच मुख्याध्यापक शिराळे यांनी योग अभ्यास करण्याविषयी योग्य मार्गदर्शन केले. यावेळी लांब यांनी अवघ्या सात मिनिटांत फिटनेससाठी उपयुक्त ठरतील अशी योगातील विविध ८४ आसने करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. तसेच शिवतांडव द्वारे मान्यवरांचे स्वागत ही केले. या शिबीरात सहभागी सर्वांना मोफत योग शिक्षण देण्यात आले. यावेळी सुत्रसंचालकांनी लांब यांच्या निःशुल्क, निस्वार्थ योगसेवेचे स्वागत केले. लांब हे भारतीय सैन्यात फिजीकल शिक्षक म्हणून कार्यरत होते. म्हणून त्यांच्या अनुभवाचा आणि मौलिक मार्गदर्शनाचा फायदा सैन्य, पोलिस भरतीचे प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी लाभदायक ठरत आहे असे सांगून त्यांनी पतंजलि योग समितीच्या योग दिंडी आपल्या दारी या समाजोपयोगी अभियानाचे ही विशेष कौतुक केले. दैनंदिन जीवनात योगाचे काय महत्त्व आहे. ते नि:शुल्क शिकविण्याचे काम लांब हे करीत आहेत. अंबाजोगाई शहर व तालुक्यातील अनेक शाळा व महाविद्यालयातून विद्यार्थ्यांसाठी १५,९,६,३,२ व १ दिवसीय अशा एकूण १५० योग प्रशिक्षण शिबीरे घेवून यात तब्बल ६५ हजारांहून अधिक विद्यार्थी आणि विद्यार्थीनींना दिनचर्या, आहार, योगिक डि.बिन्द्रिक, प्राणायाम, सर्व प्रकारचे आसन, योगनिद्रा, ध्यान यांचा अभ्यास व योगाचे धडे देण्याचे मौलिक काम माजी सैनिक लांब हे करीत आहेत. २१ वर्षे भारतीय सैन्य दलात असताना देखील लांब यांनी दरमहा आपली आर्धी पगार गोर-गरीबांसाठी खर्च केली आहे. सैन्यात देशसेवा करून सेवानिवृत्तीनंतर मागील एक वर्षांपासून अधिक काळ ते आपली आर्धी पेंन्शन सामाजिक उपक्रमांसाठी खर्च करीत आहेत. ही खरच प्रेरणादायी व कौतुकास्पद बाब आहे. माजी सैनिक लांब हे योगाच्या माध्यमातून समाजसेवा करीत आहेत. अंबाजोगाई शहर व परिसरातील युवक, युवती, ज्येष्ठ नागरिक यांना निःशुल्क, मोफत योग सेवा देवून त्यांचे स्वास्थ निरोगी राहण्यासाठी ते आहोरात्र प्रयत्नशील आहेत. माजी सैनिक योग प्रशिक्षक लांब यांनी योग क्षेत्रात अंबाजोगाईसह बीड जिल्ह्याचे नांव जगात उंचावले आहे. लांब यांच्या योग दिंडी आपल्या दारी या अभियानाची नोंद व आपण केलेल्या सातत्यपूर्ण कार्याची माहिती व प्राप्त विविध संस्थांची प्रशस्तीपत्र लांब यांनी पतंजलि योगपीठ हरिद्वार, भारत स्वाभिमान न्यास येथे जमा केली. लांब यांनी केवळ साडेपाच मिनिटांत केली ८४ आसने करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. पतंजलि योगपीठ हरिद्वार येथील शिबिराचे सुप्रसिद्ध आस्था चॅनेल वरून संपूर्ण जगभरात लाईव्ह प्रसारण करण्यात आले. ज्याचा लाभ जगभरातील योग अभ्यासकांनी घेतला होता. माजी सैनिक लांब यांच्या कार्याची दखल घेऊन योगगुरू रामदेव बाबा, आचार्य बालकृष्ण व केंद्रीय प्रभारी, भारत स्वाभिमान यांनी कौतुक करून त्यांचा यथोचित सन्मान ही केला अशी माहिती या कार्यक्रमाच्या सूत्रसंचालक कुलकर्णी मॅडम यांनी देवून उपस्थितांचे आभार मानले. या बाबत संवाद साधला असता योग प्रशिक्षक लांब यांनी सांगितले की, मागील महिन्यामध्ये जीवन शिक्षण प्राथमिक विद्यालय या शाळेला भारत स्वाभिमान न्यासकडून योगामध्ये उष्कृष्ट कार्य केल्याबद्दल प्रशस्तीपत्र दिलेले आहे. युवा पिढीसाठी आम्ही योग शिबीरे आयोजित करीत आहोत. आजसह मिळून आयोजित एकूण सर्व १५० शिबिरांना विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. ही सर्व शिबीरे विद्यार्थ्यांसाठी मोफत आयोजित करण्यात आलेली होती. या पुढेही निःशुल्क आणि मोफत योग प्रशिक्षण देण्याचे काम आम्ही करणार आहोत. त्याचा लाभ अंबाजोगाईतील सर्व नागरिकांनी घ्यावा असे आवाहन माजी सैनिक योग प्रशिक्षक लांब यांनी केले आहे.

# आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करत शिक्षणाची उंची वाढवा -ना.अतुल सावे

## भाशिप्र संस्थेचे त्रैवार्षिक शिक्षण शिबीराचे थाटात उद्घाटन

माजलगाव । प्रतिनिधी

भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या वतीने एम.आय. टी छ. संभाजीनगर येथे आयोजित तीन दिवसीय त्रैवार्षिक शिक्षण शिबीराचे उद्घाटन अपारंपारिक ऊर्जा दुग्ध व्यवसाय इतर मागास बहुजन कल्याण मंत्री ना अतुल सावे यांच्या शुभहस्ते थाटात संपन्न झाले. य शुभप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष डॉ सुरेंद्र आलुरकर , ग्रामोद्योग शिक्षण मंडळ एमआयटी सचिव मुनीशजी शर्मा , विद्यासभा उपाध्यक्ष उमेश जगताप, कार्यवाह हेमंत वैद्य, विद्या सभा अध्यक्ष डॉ जयंत जोशी, विद्यासभा संयोजक महेश कस्तुरे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी महोत्सव समिती अध्यक्षा सौ.ज्योती ठाकुर आदी मान्यवर उपस्थित होते.

उद्घाटन सत्रात प्रसंगी बोलताना ना. सावे यांनी शैक्षणिक क्षेत्रातील गरजा पुर्ण करण्यासाठी योग्य ती मदत करण्याची ग्वाही दिली. शिक्षकांच्या गुणवत्तेवरतीच विद्यार्थी उंच भरारी घेत नाव लौकीक करत असतात त्यामुळे या शिबीराच्या माध्यमातून शिक्षक योग्य ती शिदोरी घेऊन आदर्श विद्यार्थी घडवतील व शैक्षणिक शिबीर शिक्षणाची उंची वाढविण्यासाठी पुरक ठरेल, आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करत शिक्षणाची उंची वाढवण्यासाठी विशेष प्रयत्न केले पाहिजे जेणे करून भविष्यात मुलांना वाढत्या स्पर्धेत टिकण्यासाठी मदत होईल असे बोलताना सांगितले.अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी वर्ष सामोरे ठेवत कलादालनाचे

### १३०५ शिक्षकांची उपस्थिती

मराठवाड्यातील भौगोलिक दृष्ट्या सर्वात मोठी असलेली संस्थेच्या ४४ संस्कार केंद्रांच्या माध्यमातून कार्यरत असलेल्या १३०५शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी या शिबिरात सहभागी झाले आहेत.

### सेवानिवृत्त शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा सत्कार

यावेळी गेल्या तीन वर्षांत संस्थेत सेवानिवृत्त झालेल्या सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे यावेळी विष्णूपादानंदस्वामी महाराज यांच्या हस्ते व सर्व पदाधिकारी यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

उद्घाटन करण्यात आले. यामध्ये विविध चित्रांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते.अध्यक्षीय समारोप करताना संस्थेचे अध्यक्ष डॉ सुरेंद्र आलुरकर यांनी इतरांमध्ये जीवनमुल्ये रुजवत असतांना स्वतः गुणवान होणे आवश्यक आहे व २०४७ पर्यंत विकसित भारत करण्याची संकल्पना यावेळी आलुरकर यांनी प्रतिपादित केले . यावेळी प्रास्ताविका मध्ये उमेश जगताप यांनी शिबीर संकल्पना स्पष्ट केली.

दुसऱ्या सत्रात निवृत्त शिक्षक सत्कार करण्यात आला. सोबतच शिक्षकांची जीवन शैली याविषयी रा. स्व संघांचे प्रांत कार्यवाह धनंजय धामणे यांनी मार्गदर्शन केले तर शैक्षणिक समरसता विषयी विष्णुपादानंदस्वामी, मठाधिपती श्रीरामकृष्ण मठ यांनी मार्गदर्शन केले.

या त्रैवार्षिक शिक्षण शिबीराचे यामध्ये शैक्षणिक समरसता, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, आधुनिक काळातील शैक्षणिक आव्हाने, संस्था काल-आज-उद्या, भारतीय ज्ञान परंपरा, शिक्षक ते कार्यकर्ता, संस्था कुलधर्म कुलाचार, आरोग्य मार्गदर्शन, आधुनिक तंत्रज्ञानाचा अध्यापनामध्ये उपयोग, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, संस्था संवर्धनासाठी माझा दृष्टिकोन, माझी शाळा माझी जबाबदारी अशी विविध सत्र आयोजित करण्यात आलेले आहे.पुढील दोन दिवस हे शिबीर होणार आहे.



याप्रसंगी कार्यक्रमास केंद्रीय कार्यकारिणी सदस्य, सर्व पदाधिकारी, मुख्याध्यापक शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.



माजलगाव :- महाराष्ट्र विधानमंडळात सर्वाधिक तब्बल ११ वेळा सांगोला मतदारसंघाचे (आमदार) प्रतिनिधित्व केलेले शेतकरी कामगार पक्षाचे जेष्ठ नेते तथा माजी मंत्री स्व गणपतराव (आबासाहेब ) देशमुख यांचे नातु पुरोगामी युवक संघटनेचे प्रदेशाध्यक्ष तथा सांगोला विधानसभेचे आमदार भाई डॉ.बाबासाहेब देशमुख यांची सांगोला,जि.सोलापुर येथे भेट घेऊन त्यांना माजलगाव एकता पत्रकार संघाच्या वतीने मुकनायक व माजलगाव भुषण पुरस्कार वितरण सोहळ्याचे निमंत्रण देऊन सत्कार करताना पत्रकार ज्योतीराम पांढरपोटे,पत्रकार वाजेद पठाण, शेकापचे मध्यवर्ती समितीचे सदस्य भाई ऑड नारायण गोले पाटील, राजाराम जमजाळ व सांगोला नगर परिषदेचे उपाध्यक्ष राजु मगर

## मा.आ.राजेशभैय्या टोपे यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर



घनसावंगी । प्रतिनिधी

माजी आरोग्य मंत्री तथा कोरोना योद्धा राजेश भैय्या टोपे यांच्या वाढदिवसानिमित्त घनसावंगी तालुक्यातील कुंभार पिंपळगाव येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अनेक रक्तदात्यांनी रक्तदान करून राजेशभैय्या टोपे यांचा एक आगळावेगळा वाढदिवस साजरा केलाय यावेळी रवींद्र

पान ३ वर

## बोडखे, बबलु, कुमकर,लाड,दगडे,कराड,डा.मंजुश्री टेकाडे,डॉ.शेख यांच्यासह ११ जणांना आदर्श पुरस्कार

आष्टी । प्रतिनिधी

सामाजिक कार्यकर्ते स्व.मैनुद्दीन शेख स्मरणार्थ आदर्श पुरस्कार वितरण तसेच गुणवंत विद्यार्थी बक्षीस वितरण सोहळा रविवार दि.१२ जानेवारी रोजी जिजाऊ जयंतीनिमित्त सद्गुरु हॉटेल हॉल





धामणगाव रोड,मदन महाराज मठासमोर कडा येथे सकाळी १० वा.आयोजित करण्यात आलेला आहे.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आष्टीच्या तहसीलदार वैशाली पाटील या उपस्थित राहणार आहेत तर प्रमुख पाहुणे संत मदन महाराज देवस्थानचे अध्यक्ष ह.भ.प.बबन महाराज बहिरवाल,जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी मनोज धस, कडाचे सरपंच युवराज पाटील हे उपस्थित राहणार आहेत. या मान्यवरांच्या यांच्या हस्ते गौरव सोहळा पार पडणार आहे.

आदर्श पत्रकार उत्तम बोडखे, पत्रकार सय्यद बबलूभाई,पत्रकार अविशांत कल्याण कुमकर,आदर्श शिक्षक पुरस्कार श्रीमती उषाताई ढेरे, श्रीमती वैशालीताई झांजे, राजेंद्र लाड,प्रशांत दगडे, सुनिल अनारसे,आदर्श साहित्यिक अनंत कराड,आदर्श डॉक्टर - डॉ.शेख नदीम,

पान ३ वर

## खो स्पर्धेत मुलांच्या गटात शिवशारदा पब्लिक स्कूल विजेता तर जयभवानी विद्यालय उपविजेता

गेवराई । प्रतिनिधी

जयभवानी आणि जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळ अंतर्गत सुरू असलेल्या क्रीडा महोत्सवात जयभवानी विद्यालय शिवाजीनगरच्या भव्य मैदानावर आयोजित केलेल्या खो-खो स्पर्धेत मुलांच्या गटात शिवशारदा पब्लिक स्कूलने विजेतेपद पटकावले तर जयभवानी विद्यालयाचा संघ उपविजेता ठरला. यावेळी जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे संचालक श्रीराम अरगडे, स्पर्धा आयोजक रणवीर पंडित, युवानेते पृथ्वीराज पंडित, महामार्ग पोलिस स्टेशनच्या पोलिस उपनिरीक्षक निरीक्षक पल्लवी जाधव यांच्यासह मान्यवर यावेळी उपस्थित होते.



युवानेते पृथ्वीराज पंडित यांची प्रमुख उपस्थिती

शारदा स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली चौथा क्रीडा महोत्सव गेवराई तालुक्यात मोठ्या उत्साहात सुरू आहे. क्रीडा महोत्सवाच्या सहाव्या दिवशी जयभवानी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या भव्य मैदानावर

पान ३ वर

## पिंपळ्यात पिर गैबीसाहेब यात्रा महोत्सवात कुस्त्यांच्या जंगी सामन्यात राजस्थानच्या मुलीने खेळली कुस्ती

वडवणी । प्रतिनिधी

वर्षोने वर्ष चालत आलेल्या कुस्त्यांच्या आखाड्यात अनेक मातब्बर पैलवान जिंकले हारले परंतु वडवणी तालुक्यातील पिंपळा येथे प्रतिवर्षाप्रमाने याही वर्षी आज दि १०-०१-२०२५ रोजी पिर गैबीसाहेब यात्रा महोत्सवात कुस्त्यांचे आयोजन गावक-यांच्या वतीने करण्यात आले होते.

यावेळी राज्यभरातुन पैलवानांची हजेरी पिंपळ्यात लागली होती.त्याचबरोबर राज्यस्तरीय कुस्ती खेळणारी



राजस्थानची मुलगी तीनेही कुस्ती खेळण्यासाठी पिंपळ्यात हजेरी लावली होती.पंचक्रोशीतील व परिसरातील कुस्ती शौकीनांचे या कुस्तीकडे लक्ष लागून होते.

बीड जिल्ह्यातील मुलीने राजस्थानच्या मुलीला चितपट करत विजय मिळवला.मात्र बीड जिल्ह्यातील जनता मायाळू आसुन कुणालाही रिकाम्या हाताने परत लावत नाही हे पिंपळ्याच्या कुस्त्यामध्ये दिसुन आले.सरपंच केशवराव आंधळे व पिंपळा गावकऱ्याच्या

पान ३ वर

## माजी सरपंच भीमराव राठोड यांचे निधन

जालना । प्रतिनिधी



काकडा ता.जि. जालना येथील माजी सरपंच भीमराव दगडू राठोड यांचे १० जानेवारी रोजी निधन झाले आहे. मृत्यूसमयी त्यांचे वय ८५ वर्षे होते. ते १९८५ ते १९९५ या कालावधीत ते काकडा ग्रामपंचायतचे सरपंच होते. त्यांच्यावर काकडा येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात रतन दगडू राठोड, पांडुरंग दगडू राठोड व लालचंद दगडू राठोड हे तीन भाऊ, दोन मुले रामेश्वर भीमराव राठोड, प्रकाश भिमराव राठोड, एक मुलगी, सुना, नातवंड असा मोठा परिवार आहे.

## भक्ती ज्ञान वैराग्याचा त्रिवेणी संगम भागवत ग्रंथ पुराण-कथाप्रवक्ते बबन देवा जोशी

बीड । प्रतिनिधी

**या भूतलावरील संपूर्ण जीव दृष्टी ला भक्ती,ज्ञान, वैराग्य तसेच आपल्या जीवनामनचे अंतिम सार सांगणारा ग्रंथ म्हणजेच भागवत कथा पुरण ग्रंथ आहे असे प्रतिपादन ह भ प भागवत कथा प्रवक्ते बबन देवा महाराज जोशी यांनी काल पंढरपूर येथील भागवत कथेच्या प्रथमदिनी प्रतिपादित केले.**

श्रीक्षेत्र पंढरपूर येथे दिनांक ९ जानेवारी २०२५ पासून नारायणगड मठ पंढरपूर येथे भागवत कथा ज्ञान यज्ञ सोहळा व तुळशी अर्चना नामजप चालू आहे .



कथेच्या पहिल्याच दिवशी व्यासपीठ पूजन करण्यात आले तसेच कथा आरंभ झाली कथेच्या पहिल्याच दिवशी महाराजांनी भागवत ग्रंथ पुराणाची महती विशद केली.या ग्रंथामध्ये भक्ति ज्ञान वैराग्य याची माहिती सांगितली. शाप मुक्त जीवन जगण्यासाठी भागवत ग्रंथ एकमेव साधन आहे असे प्रतिपादन केले.

तुलसी पूजा..

या नाम सप्ताहात अखंड आपलं आयुष्य जनहितार्थ अर्पण करणाऱ्या तुळशी मातेची विधिवत पूजा करून तुलसी महात्म्य

पान ३ वर

## रेल्वे विभागीय सल्लागार समिती सदस्य अर्जुन गेही

जालना । प्रतिनिधी

माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या शिफारशी नूसार रेल्वे प्रशासनातर्फे नांदेड विभागीय सल्लागार समिती सदस्य पदी विद्यमान सदस्य , उद्योजक अर्जुन गेही यांची फेर नियुक्ती करण्यात आली आहे.

रेल्वे च्या नांदेड विभागीय प्रबंधक श्रीमती निती सरकार यांनी नियुक्ती बद्दल चे पत्र अर्जुन गेही यांना पाठवले. विशेष म्हणजे सन २०१३ पासून अर्जुन गेही हे विभागीय समितीवर सदस्य म्हणून



आहेत. आगामी सन २०२६ पर्यंत त्यांची फेर नियुक्ती करण्यात आली.

दरम्यान निवड झाल्याबद्दल माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे, ,आ.नारायण कुचे, जालना विधानसभा प्रमुख भास्करराव

पान ३ वर



## वाळू उपसा करणारी माफियाचे साहित्य जप्त करून जाळले

अंबड । प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील गोदापत्रांमध्ये तहसील कार्यालय यांचे पथक पथकाने वाळू माफ यावर धडाकेबाज कारवाई करून वाळू उपसा करण्याचे साहित्य जप्त करून जाळण्यात आले.

सदरील कारवाई उपविभागीय दंडाधिकारी तसेच तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार श्री विजय चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली व नियोजनाखाली गोदापत्रातील सर्व ठिकाणावरील कारवाई केली तसेच वाळू उपसा करण्याचे साहित्य जप्त करून जाळण्यात येत आहे व तशीच कारवाई रात्री उशिरापर्यंत सुरूच असून नदीपात्रातून उत्खनन बंद करण्याकरता गोपनी य लोकेशन मार्फत सदरील कारवाई सुरू आहे.

## आ.धस, आ.क्षीरसागर यांना जशास तसे उत्तर देऊ म्हणून धमकी देणाऱ्या जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण व संजय दौंड यांना काय त्यांचा खून करायचा आहे की काय ?

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अन्यायाच्या विरुद्ध आवाज उठवणाऱ्या आ सुरेश धस, आ संदीप क्षीरसागर यांना जशास तसे उत्तर देऊ म्हणणारे राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण व मा आ संजय दौंड यांना नेमकं काय म्हणायचं आहे अशी धमकी देऊन त्यांना काय सुरेश धस यांचा खून करायचा आहे का?

असा सवाल शेतकरी संघटनेचे नेते कालिदास आपेट यांनी आयोजित पत्रकार परिषदे मध्ये केला. या वेळी कालिदास



आपेट यांच्या समवेत शिवसेनेचे मदन परदेशी, अ भा काँग्रेस ईश्वर शिंदे, कल्याण भगत, हनुमंत फड (रा कॉ तालुका अध्यक्ष परळी), उत्तमराव माने, अब्दुल फता पटेल, उत्तमराव माने, शाम जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

संतोष देशमुख यांच्या हत्येच्या सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यूच्या अनुशंगाने घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदे मध्ये कालिदास आपेट हे बोलत होते.

या वेळी बोलताना कालिदास आपेट म्हणाले की, संतोष देशमुख यांची हत्या राजकीय कार्यकर्त्यांची हत्या असून रा कॉ अजित पवार गटाचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, संजय दौंड यांनी अंबाजोगाई मध्ये आयोजित केलेल्या पत्रकार परिषदे मध्ये खा बजरंग सोनवणे, आ सुरेश धस, आ संदीप क्षीरसागर, आ नमिताताई मुंदडा, आ प्रकाश सोळंके, आ विजय सिंह पंडित ही मंडळी संतोष देशमुख यांच्या हत्येच्या विरोधात आवाज उठवत असताना त्यांच्यावर आक्षेप नोंदवला. अन्यायाच्या विरुद्ध या मंडळीने फक्त सभागृहात आवाज उठवावा त्यांनी बाहेर भूमिका मांडू नये का? धस यांनी पीक विमा, राख, वाळू, वीट भट्ट्या, मुरूम, या बाबत भूमिका मांडली, सभागृहात जी भूमिका तीच भूमिका बाहेर ही ते मांडत आहेत. सुरेश धस यांचा आवाज दाबणार असाल आमचं तर नरडे दाबणार का? शेतकऱ्यांनी आत्महत्या केली त्यावेळी राजेश्वर चव्हाण गप्प का?

पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# नायलॉनचा मांजा विकाल तर याद राखा! पुणे पोलिसांची विक्रेत्यासह डीलरलाही तंबी

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यासह देशभरामध्ये मकर संक्रांतीची जोरदार तयारी सुरु आहे. मकर संक्रांतीच्या निमित्ताने रंगीबेरंगी पतंग उडवले जातात. त्याचबरोबर एकमेकांच्या पतंगी कापण्याची स्पर्धा देखील लागलेली आहे. मात्र या स्पर्धेच्या इर्षेमध्ये नायलॉन मांजा वापरला जातो. नायलॉन मांज्यामुळे अनेक पक्ष्यांचे आणि गाडी चालवणाऱ्या लोकांचे प्राण जात आहे. पुण्यामध्ये देखील अशाप्रकारे नायलॉनचा मांजा वापरला जात असून त्याच्या विक्रीवर आळा घालण्याचा प्रयत्न केला जात आहे. पुणे पोलीस मांजा विक्रेत्यासह त्याची डील करणाऱ्या डिलरवर देखील लक्ष ठेवून आहे.

धारदार नायलॉनच्या मांजाचा जीवघेणा खेळ थांबविण्यासाठी मुळापर्यंत जाऊन कारवाई करण्याचा आक्रमक पवित्रा पुणे पोलिसांनी घेतला आहे. शहरात नायलॉन मांजामुळे अनेक जण गंभीर जखमी झाले आहे. तर काही जणांना जीव गमवावा लागला आहे.



कोंढवा बुद्रुक परिसरात नायलॉन मांजामुळे दोन महिला गंभीर जखमी झाल्याची घटना घडली होती. यापूर्वीही या धारदार मांजामुळे अनेक नागरिक जखमी झाल्याचे देखील समोर आले आहे. त्यामुळे नायलॉन मांजा विक्रीवर बंदी असतानाही शहरात अशा मांजाची विक्री होत असल्याचे प्रकार पुणे पोलिसांनी केलेल्या कारवाईवरून समोर आला आहे. यापुढे नायलॉनचा मांजा विकणाऱ्यांविरोधात पुणे पोलिसांनी कडक पाऊले उचलली असून आता नायलॉन मांजा विक्री करण्याबरोबर, मांजा विक्री करणारे डिलर आणि असा मांजा उत्पादन करणारे यांच्यावर आता थेट कारवाईचा बडगा उगारण्यात येणार आहे. त्यामुळे अशी अवैध मांजा विक्री व उत्पादन पोलिसांच्या रडारवर आले आहे.पुणे शहरातील आतापर्यंत पोलिसांनी केलेल्या कारवाईवरून दरवर्षी हा नायलॉन मांजा बाजारात विक्रीसाठी आल्यानंतर येथे त्यांच्यावर कारवाईचा बडगा उगारला जातो. मात्र कारवाई केवळ मांजा विक्रेता करणार्या दुकानावर होते. परंतु, मांजाची डिलर आणि मांजाचे उत्पादन करणारे याला कारणीभूत ठरतात त्यांच्यावर मात्र कारवाई होत नाही. त्यामुळे मांजाचे डिलर आणि उत्पादन कर्त्यांवर कारवाई केली जाणार आहे. २०१७ पासून हानिकारक नायलॉन मांजाचे उत्पादन, विक्री व वापरावर बंदी घालण्यात आली आहे. बारीक काचेचा लेप असलेला मांजा शहराच्या अनेक दुकानांमध्ये सर्रास विकला जात आहे. पुणे शहरात गेल्या पाच वर्षांत नायलॉन मांजाचे किमान १६ गुन्हे पोलिसांनी दाखल केले आहे. २०२३ मध्ये ७ गुन्हे दाखल करण्यात आले आहे. २०२४ मध्ये पोलिसांनी चार गुन्हे दाखल केले आहेत. तर पाच जणांना अटक करण्यात आली आहे. शहरात अशा असंख्य घटना घडल्या आहेत मात्र पुढे येऊन तक्रारी न दिल्याचीही उदाहरणे आहेत.

# कृषी आयुक्तालयातील उपसंचालक एसीबीच्या जाळ्यात; अडीच लाख रुपयांची लाच घेताना पकडले

**पुणे । प्रतिनिधी**

कृषी आयुक्तालयातील फलोत्पादन विभागातील उपसंचालक संजय गुंजाळ लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) जाळ्यात अडकले आहेत. गैरव्यवहार प्रकरणात निलंबित केलेल्या कर्मचाऱ्याकडून तीन लाख रुपयांची लाच मागितल्यामुळे त्यांना पकडण्यात आले आहे. संगमवाडी परिसरात शुक्रवारी रात्री उशीरा ही कारवाई करण्यात आली आहे. निलंबित कर्मचाऱ्याकडून अडीच लाख रुपयांची लाच घेताना गुंजाळ यांना ताब्यात घेतले आहे.

याप्रकरणी कृषी आयुक्तालयातील फलोत्पादन विभागातील उपसंचालक, प्रभारी सहसंचालक संजय बहादू गुंजाळ यांच्यावर भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमान्वये येरवडा पोलीस ठाण्यात रात्री उशीरा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत कृषी आयुक्तालयातील निलंबित कर्मचाऱ्याने तक्रार दिली आहे. तक्रारदार २०१९-२०२० मध्ये जळगाव जामोद बुलढाणा येथे कनिष्ठ लिपिक होते. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेअंतर्गत गैरव्यवहार, तसेच कसुरी केल्याचा ठपका ठेवून अमरावतीतील कृषी सहसंचालकांनी त्यांना सेवेतून निलंबित केले होते. याप्रकरणाची चौकशी सुरू होती. निलंबन कालावधीत मदत करणे, तसेच तक्रारदारावर घेतलेल्या आक्षेपांविरुद्ध मदत करण्यासाठी गुंजाळ यांनी त्यांच्याकडे तीन लाख रुपयांची लाच मागितली. तक्रारदाराने तडजोडीत अडीच लाख रुपयांची लाच देण्याचे मान्य केले. तर पुणे एसीबीकडे तक्रार दिली होती. या तक्रारीची पडताळणी करण्यात आली.तक्रारीत तथ्य



आढळल्याने सापळा लावला. शुक्रवारी रात्री तक्रारदाराला अडीच लाख रुपये घेऊन संगमवाडी येथील खासगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या आराम बस थांब्यावर बोलाविण्यात आले. तक्रारदाराकडून लाच घेताना गुंजाळ यांना पकडण्यात आले. पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांच्या मार्गदर्शनखाली ही कारवाई करण्यात आली. रात्री उशीरा त्यांच्यावर येरवडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात अला आहे. पोलीस निरीक्षक प्रवीण निंबाळकर अधिक तपास करत आहेत.

# लोणावळ्यातील जुगार अड्ड्यांवर धडक कारवाई; पोलिसांनी ४ जणांना घेतले ताब्यात

**लोणावळा । प्रतिनिधी**

लोणावळा शहर पोलिसांनी लोणावळा शहर हद्दीमध्ये बेकायदेशीरपणे सुरू असलेल्या मटका अड्ड्यांवर धडाकेबाज कारवाई करीत सदरचे अड्डे बंद केले आहेत. पोलिसांनी एकूण तीन मटका अड्ड्यांवर छापा टाकून ४ आरोपींना ताब्यात घेतले आहे. तसेच सहा हजार चारशे दहा रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याशिवाय बेकायदेशीर दारू विक्री करणाऱ्या एका व्यक्तीवर कारवाई करीत त्याच्या ताब्यातील चौदाशे रुपयांच्या चाळीस मद्याच्या बाटल्या जप्त केल्या आहेत.

पोलीस निरीक्षक अरुण फुगे आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल लाड यांच्या



मार्गदर्शनाखाली लोणावळा शहर पोलिसांनी केलेल्या कारवाई मध्ये किरण राजु जाधव (वय ३२ वर्षे,) विकास भिमाजी पैलवान (वय ३२, दोघे रा. गवळीवाडी लोणावळा), वैभव भगवान साठे (वय २५ वर्ष ,रा. ओळकाईवाडी, कुसगाव ता. मावळ जि.) आणि अशोक जगन्नाथ फाळके (रा.आण्णाभाऊ वसाहत सिद्धार्थनगर, लोणावळा) या चौघांना तीन वेगवेगळ्या अड्ड्यावर लोकांकडून पैसे घेऊन कल्याण मटका नावाचा जुगार खेळताना ताब्यात घेतले. या सर्वांवर महाराष्ट्र जुगार बंदी अधिनियम कलम १२ (अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# शेतकऱ्यांचे विद्युतपंप चोरणारी टोळी जेरबंद; तब्बल 'इतक्या' लाखांचा मुद्देमाल हस्तगत

**बारामती । प्रतिनिधी**

बारामती तालुक्यातील जिरायती भागातील विद्युत पंप चोरणारी टोळी जेरबंद करण्यात वडगाव निंबाळकर पोलिसांना यश आले असून, याप्रकरणी सहा सराईत आरोपींना अटक केली आहे. आरोपींकडून गुन्हयातील एकूण ३ लाख १६ हजार ७०० रुपयांचा मुददेमाल हस्तगत केला आहे.

पोलिसांच्या या धडाकेबाज कामगिरीमुळे जिरायती भागात शेतातील विहीरीवरील विद्युत पंपाच्या चोरीने हैराण झालेल्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. याप्रकरणी अप्पर पोलीस अधिक्षक गणेश बिरादार, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. सुदर्शन राठोड यांनी पत्रकार



परिषदेत अधिक माहिती दिली.

बारामती तालुक्यातील लोणीभापकर, सायंबाचीवाडी गावच्या हददीतील शेतकऱ्यांच्या शेतातील विहिरीतील विद्युतपंप चोरीचे प्रकार वाढीस लागल्याने शेतकरी हैराण झाले होते, त्याचबरोबर शेतातील पिके ही धोक्यात आली होती. या पार्श्वभूमीवर प्रभारी अधिकारी सहायक पोलीस निरीक्षक सचिन काळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार तौफीक मणेरी, भाउसो मारकड यांनी गोपनीय माहीती काढत आरोपींची माहिती मिळविली.

आरोपी ओंकार राजेश आरडे (वय २५), महेश दिलीप भापकर (वय ३१)अमोल लहु कदम (वय २८) निलेश दत्तात्रय मदने (वय २८ ) प्रथमेश जालिंदर कांबळे (वय २२ सर्वजण रा. लोणी भापकर ता. बारामती जि. पुणे ) यांना ताब्यात घेवून चौकशी केली. तसेच गोपनीय माहीती व तांत्रिक माहीतीच्या आधारे आरोपींकडे अधिक चौकशी केली असता, त्यांनी विद्युतपंप चोरी केल्याची कबुली दिली. आरोपी कालीदास शिवाजी भोसले (वय-४२ रा. लोणी भापकर) यास चोरी केलेले विद्युत पंप विक्री केल्याची कबुली दिली. या सर्व आरोपींना अटक करण्यात आली आहे.

विद्युतपंप चोरीचे १७ गुन्हे उघड

विद्युतपंप चोरीचे १७ गुन्हे उघड झाले आहेत. तसेच त्यांच्याकडून इतर गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे. दरम्यान, चोरी उघड झाल्याने शेतकऱ्यांनी अतिरिक्त पोलीस अधिक्षक गणेश बिरादार, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. सुदर्शन राठोड, सहायक पोलीस निरीक्षक काळे यांना सन्मानित केले. पोलीस अधिक्षक पंकज देशमुख, अपर पोलीस अधिक्षक गणेश बिरादार, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. सुदर्शन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली, सहायक पोलीस निरीक्षक सचिन काळे, पोलीस उपनिरीक्षक राहुल साबळे, राहुल सुतार आदींनी या कारवाईत सहभाग घेतला.

# पुण्यात पोलिसच असुरक्षीत! नशेखोर युवकानं भररस्त्यात पोलिसाला केली मारहाण

पुणे । प्रतिनिधी

पुण्यातील मगरपट्टा परिसरात एक संतापजनक घटना घडली आहे. एका युवकानं भररस्त्यात पोलिसाला मारहाण केली आहे. शनिवारी संध्याकाळी ६.३० वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली आहे. या युवकानं प्रचंड नशा केली होती, अशी प्राथमिक माहिती मिळाली आहे. दरम्यान, स्थानिकांनी या युवकाला पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित तरुण हा नशेत होता. हा युवक मगरपट्टा भागात एका ज्येष्ठ नागरिकाला तो मारहाण करत होता. तसेच रस्त्यावरुन जात असलेल्या अनेकांना तो दगड सुद्धा फेकून मारत होता. दरम्यान, या ठिकाणी आपले कर्तव्य बजावत असलेले वाहतूक शाखेचे पोलिस कर्मचाऱ्यांनी त्या तरुणाला




हाटकले. यावेळी राग अनावर झाल्यानं त्या तरुणाने थेट त्या पोलीस कर्मचाऱ्यावर हल्ला केल्याची घटना घडली आहे. यानंतर जमावाने या तरुणाला पोलिसांच्या ताब्यात दिले. मिळालेल्या माहितीनुसार, हडपसर वाहतूक विभागातील पोलीस कर्मचारी सायंकाळी मंगरपट्टा परिसरातील रासकर चौकात कर्तव्यावर होते. यावेळी विरुद्ध दिशेनं येणाऱ्या वाहनांवर ते कारवाई करत होते. त्यावेळी एक जण तिथे थांबलेल्या नागरिकांला दगडाने मारहाण करण्याचा प्रयत्न करत होता. त्यावेळी इथं कर्तव्यावर असलेल्या वाहतून पोलिसाने त्याला हटकले. याचा राग आल्यानं त्या तरुणाने वाहतून पोलिसालाच मारङाम केल्याचा प्रकार घडला. सध्या या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच हडपसर वाहतूक विभागाचे पोलिस निरीक्षक तसेच हडपसर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. यावेळी त्यांनी आरोपीला ताब्यात देखील घेतलं आहे. दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार हा आरोपी मानसिक आजारी असल्याचं सांगण्यात आलं आहे. हडपसर पोलिसा ठाण्यात या आरोपीविरुद्ध रात्री उशीरापर्यंत गुन्हा दाखल करण्याचे काम सुरु होते. या घटनेनंतर पुण्यात पोलिसच असुरक्षीत असल्याची चर्चा सुरु झाली आहे. नशेखोर युवकानं पोलिसांना मारहाण केल्याचा हा व्हिडीओ सध्या सर्वत्र व्हायरल होत आहे. त्यामुळं याची सर्वत्र चर्चा सुरु झाली आहे. दरम्यान, आयाधी देखील पुण्यात पोलिसांवर हल्ल्याचा प्रयत्न झाल्याच्या घटना घडल्या आहेत.

# उच्चशिक्षित दांपत्यांचा १८ दिवसात परस्पर संमतीने घटस्फोट मंजुर !

पुणे । प्रतिनिधी

वैचारिक मतभेदामुळे दोन वर्षांपासून वेगळे राहणाऱ्या उच्चशिक्षित दांपत्याचा घटस्फोट अवघ्या १८ दिवसात कौटुंबिक न्यायालयाचे न्यायाधीश भाटीया यांनी मंजुर केला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या न्याय-निवाड्यानुसार परस्पर संमतीने घटस्फोटाचा दावा दाखल करण्यापूर्वी दोघे १८ महिने वेगळे राहत असल्यास सहा महिन्याचा कालावधी वगळता येतो.

या प्रकरणात दोघे दोन वर्षे वेगळे राहत आहेत. त्यामुळे हा कालावधी वगळण्याची मागणी अर्जदार वकिलांनी केली. त्यानुसार




न्यायालयाने हा निकाल दिला आहे. २८ डिसेंबर २०२४ रोजी दाखल केलेला दावा ९ जानेवारी २०२५ ला निकाली निघाला.

माधव आणि माधवी (नावे बदलली आहेत) अशी त्या दोघांची नावे आहेत. दोघांनी ॲड. प्रतिक नामदेव आरोटे, ॲड. प्राजक्ता गजरमल यांच्यामार्फत कौटुंबिक न्यायालयात परस्पर संमतीने घटस्फोटासाठी अर्ज दाखल केला होता. दोघेही उच्चशिक्षित आहेत. दोघेही नोकरी करतात. जानेवारी २०१६ मध्ये दोघांचा विवाह झाला. एक मुलगा आहे. तो दोन वर्षाचा आहे.

वैचारिक मतभेदामुळे डिसेंबर २०२२ पासून दोघे वेगळे राहत आहेत. दोघांनी परस्पर संमतीने घटस्फोटासाठी अर्ज केला होता. न्यायालयाने तो मंजुर केला. निकालानुसार मुलगा आईकडे असणार आहे. मात्र, वडील त्याला भेटू शकणार आहेत. याशिवाय दोघात कसलीही देवाण-घेवाण नाही.

दोघेही दोन वर्षांपासून वेगळे राहत होते. परस्पर संमतीने दोघेही घटस्फोट घेण्यास तयार असल्याने दोघांना आणखी सहा महिने थांबविणे योग्य नव्हते. या निर्णयामुळे वेळेची बचत झाली आहे. दोघेही स्वतंत्र्यपणे आयुष्य जगण्यास मोकळे झाले आहेत.


– ॲड. प्रतिक आरोटे,

# सायबर चोरट्यांकडून पुण्यातील तिघांची फसवणूक; तब्बल ८० लाखांना घातला गंडा

पुणे । प्रतिनिधी

पुण्यात फसवणुकीचे सत्र सुरुचं असून, पुण्यातील वेगवेगळ्या भागातून फसवणुकीच्या घटना उघडकीस येत असतात. अशातचं आता सायबर चोरीच्या तीन घटनांत तिघांची तब्बल ८० लाख रुपयांची फसवणूक झाली असून, ट्रेडींग टास्क, शेअरमधील नफा तसेच मनीलॉन्ड्रींगच्या प्रकरणात कारवाईची भिती दाखवून ही फसवणूक केली आहे.

पहिल्या घटनेत ३२ वर्षीय तरुणाने हडपसर पोलिसांत तक्रार दिली आहे. त्यानूसार, अज्ञाताविरोधात गुन्हा नोंदवला आहे. या तरुणाला वर्कफ्रॉम-होमचे आमिष दाखविले. त्याला



क्रिप्टोकरन्सी ट्रेडींगचे टास्क दिला व त्या बदल्यात चांगले कमीशन देतो असे सांगितले. सायबर ठगांनी तरुणाकडून वेळोवेळी २७ लाख ७ हजारांचा गंडा घातला. तर, दुसर्या घटनेत पार्ट टाईम नोकरीचे आमिष दाखवून रविवार पेठेतील तरुणीला टास्क फ्रॉड्द्वारे सायबर ठगांनी ३ लाख ६२ हजार रुपयांचा गंडा घातला. याबाबत ३६ वर्षीय तरुणीने खडक पोलिसांत तक्रार दिली आहे. सायबर चोरट्यांनी मोबाईलवर वर्क फ्रॉम होमचा संदेश पाठवला. नंतर तिला आर्थिक प्रलोभन दाखवत पेड टास्कच्या माध्यमातून जास्त पैसे मिळतील असे सांगण्यात आले होते.



# महागड्या चार चाकी कार चोरणाऱ्या आंतरराष्ट्रीय टोळीला ठोकल्या बेड्या

पिंपरी । प्रतिनिधी

पिंपरी चिंचवड शहर पोलिसांच्या वाकड पोलिसांनी महागडच्या चार चाकी कार चोरणाऱ्या आंतरराष्ट्रीय टोळीला बेड्या ठोकल्या आहेत. तसेच त्यांच्या ताब्यातून तिन चार चाकी वाहन आणि चार चाकी वाहनांच्या बनावट चाव्या असा जवळपास ६० लाख रुपये किमतीचा मुद्देमाल ही जप्त केला आहे. अल्ताफ कासम अत्तार, जुबेर कयामुद्दिन कुरेशी, मुसाहिद अलिहास खान आणि जानिशार कमर आली अशी या चार आरोपींना पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. तसेच या चारही आरोपीकडून पोलिसांनी चार चाकी वाहन चोरीचे एकूण ९ गुन्हे उघडकीस आले आहेत. यात पिंपरी चिंचवड आणि नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील चार चाकी वाहन चोरीच्या गुन्ह्याचाही सहभाग असल्याची माहिती परिमंडळ २ चे पोलिस उप आयुक्त विशाल गायकवाड यांनी दिली आहे.

# कामात कुचराई केल्यास कारवाई; महसूलमंत्र्यांची पुण्यातील कामचुकार अधिकाऱ्यांना तंबी

पुणेः राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पाच जिल्ह्यांची आढवा बैठक घेतली. या आढावा बैठकीत महसूल वसुलीचे धोरण साध्य करण्याच्या सूचना त्यांनी उपस्थित असणाऱ्या अधिकाऱ्यांना दिल्या. तसेच उद्दीष्ट साध्य करण्याकडे लक्ष द्यावे, अधिकाअधिक वसूली करण्यात यावी, अशा सूचना त्यांनी महसूल विभागातील अधिकाऱ्यांना केल्या आहेत. तसेच महसूल विभागातील अधिकाऱ्यांनी कामात कुचराई केली तर कारवाई करण्यात येईल, अशा कडक शब्दांत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अधिकाऱ्यांना इशारा दिला.



महसूल वसुलीचे प्रत्येक जिल्ह्याला दिलेले उद्दिष्ट साध्य करण्याकडे अधिकाऱ्यांनी लक्ष द्यावे, अधिकाधिक वसुली करण्यात यावी. महसूल वाढीसाठी काही नाविन्यपूर्ण योजना असतील तर त्याचा विचार केला जाईल, चांगली कामगिरी करणाऱ्या अधिकाऱ्यांचे कौतुक केले जाईल तर कामात कुचराई करणाऱ्या अधिकाऱ्यांना एकदा सुधारण्याची संधी देण्यात येईल. बदल नाहीच झाला, तर कारवाई करण्यात येणार असल्याची तंबी बावनकुळे यांनी या बैठकीत अधिकाऱ्यांना दिली.

ही आढावा बैठक शुक्रवारी पुणे विभागीय कार्यालयात पार पडली. या बैठकीला विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, अपर आयुक्त कविता द्विवेदी, अपर आयुक्त समीक्षा चंद्रकार, पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र हुडी यांच्यासह चार जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, अतिरिक्त जिल्हाधिकारी, निवासी उपजिल्हाधिकारी, तहसीलदार, उपविभागीय अधिकारी आदी अधिकारी उपस्थित होते.